www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118

दैनिक
# लोकरक्षणाय
प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक

लोकशाहीच्या संरक्षणार्थ



■ कळवा- खारेगावातील जुन्या इमारतींच्या पुनर्विकासाला खीळ

पान ३ वर....



■ गोंदिया ते सडक अर्जुनी मार्गावर एसटी उलटली बसमधून...

पान ६ वर....

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक १८० ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, शनिवार,३० नोव्हेंबर २०२४ ■ रु. २/- ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118

## महाराष्ट्रातल्या उमेदवारांना ईव्हीएमवर संशय; २२ उमेदवारांचे पडताळणीसाठी अर्ज

● मुंबई, यश सावंत :

**विधानसभा निवडणुकीचा निकाल हाती आलाय. महायुतीनं जोरदार मुसंडी मारत बहूमताचा आकडा गाठलाय. त्यानंतर विरोधकांनी ईव्हीएमविरोधात मोहीम सुरु केलीये. राज्यातील काही मतदारसंघात ईव्हीएम मशीनची पडताळणी करण्याची मागणी विरोधकांसह सत्ताधारी भाजप नेत्यांनी केलीये. विधानसभा निवडणूक निकालानंतर विरोधकांनी ईव्हीएमविरोधात मोहीम सुरु केलीय.**




ईव्हीएममध्ये गडबड असल्याचा पराभूत आमदारांना संशय आहे. ईव्हीएमवर संशय असणाऱ्या आमदारांमध्ये भाजप नेते राम शिंदे यांचाही समावेश आहे. महाराष्ट्रातल्या एकूण २२ उमेदवारांनी ईव्हीएम पडताळणीसाठी अर्ज केलेत.

उमेदवारांना एकूण मतदान केंद्रांच्या पाच टक्के मतदान केंद्रांवरील ईव्हीएम पडताळणी करता येते. एका केंद्रावरील ईव्हीएम पडताळणीसाठी ४७ हजार २०० रुपये शुल्क लागतं. कोर्टात कुणी आव्हान न दिल्यास अर्ज केल्याच्या ४५ दिवसांत ही पडताळणी होते.

पान २ वर

## मुळा–मुठा नदीतील अतिक्रमण, अरुंद होणारे पात्र यामुळेच पूर; समितीच्या अहवालातून उघड

● पुणे, अभिजित येरल्लू :

मुळा–मुठा नदीला आलेल्या पुरासंदर्भात महापालिका प्रशासनाने नियुक्त केलेल्या समितीच्या शिफारसीनुसार पुढील कार्यवाही केली जाणार आहे, असे आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी स्पष्ट केले आहे. महापालिकेने, पाटबंधारे विभागाने गेल्या अनेक वर्षापासून मुळा-मुठा नदी आणि नाल्यांमध्ये होणारे अतिक्रमण, अरुंद होणारे पात्र याकडे लक्ष दिले नसल्याने मुठा नदीला जुलै महिन्यात नदीला पूर आलेला होता असा ठपका महापालिका आयुक्तांनी नियुक्त केलेल्या समितीने ठेवला आहे. यंदाच्या वर्षी पुणे शहरात झालेल्या मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी पुराचा फटका बसला आहे. त्यामुळे अनेक नागरिकांचे नुकसान झाले होते.



नदीपात्रातील अतिक्रमणे काढून टाकावीत, राडारोडा टाकण्यांवर कडक कारवाई करावी, नाल्यांच्या स्वच्छतेकडे लक्ष द्यावे अशा, पूर रेषेच्या आतील अवैध बांधकामे पाडून टाकावीत अशी शिफारस समितीने केली आहे. दरम्यान हा अहवाल आयुक्तांना सादर होऊन दोन महिने झाले, त्यावर अद्याप बैठक घेतली नाही. आता आयुक्तांकडून बैठक घेऊन कारवाईचे आदेश दिले जाणार आहेत.

पान २ वर

## संतापजनक ! लिफ्ट सफाई कर्मचाऱ्यांकडून शाळेतील ३ चिमुकलींचा विनयभंग

● मुंबई, राकेश गायकवाड :



बदलापूरच्या शाळेत घडलेल्या घटनेने राज्यासह देशातील समाजमन ढवळून निघाले होते. अशीच घटना मुंबईच्या भांडुप येथून एक संतापजनक घटना समोर आली आहे.

भांडुपमधील एका नामांकित शाळेत पुन्हा एकदा बदलापूरसारखीच घटना समोर आली आहे. लिफ्ट सफाई कर्मचाऱ्यांकडून शाळेतील तीन चिमुकलींचा विनयभंग केल्याची घटना घडली आहे. नामांकित शाळेत योगासने शिकण्यासाठी येणाऱ्या विद्यार्थिनींसोबत हा संतापजनक प्रकार घडल्याचे समोर आले आहे. विद्यार्थिनींनी हा प्रकार घरी सांगितल्याने ही घटना समोर आली. याप्रकरणी पोलिसांमध्ये या संदर्भात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार २७ नोव्हेंबर रोजी सकाळी १० ते दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. शाळेच्या बेसमेंटमध्ये १० व ११ वर्षीय दोन मुली योगासने करत होत्या.

पान २ वर

## ठाकरे गटाच्या दिपेश म्हात्रे यांनी VVPAT मतमोजणीसाठी भरले लाखो रुपये

● डोंबिवली, गणेश बागडे :

विधानसभा निवडणूक निकालानंतर राज्यात महायुतीचे उमेदवार बहुमतांनी विजयी झाले. दरम्यान या सगळ्या निकालावर महाविकास आघाडी आणि इतर पक्षांनी नाराजी व्यक्त केली आहे. राज्यभरात महायुतीच्या विजयावर विरोधकांकडून मतमोजणीवर संशय उपस्थित केला जात आहे. अशातच आता ठाकरे गटाच्या उमेदवाराने घेतलेल्या निर्णयामुळे डोंबिवलीत एकच खळबळ उडाली आहे.

डोंबिवली विधानसभा मतदार संघातून भाजपचे उमेदवार आणि सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण हे बहुमताने विजयी झाले. या निकालावर विरोध दर्शवत ठाकरे गटाचे उमेदवार दीपेश म्हात्रे मतमोजणीवर शंका उपस्थित केली आहे.निवडणूकीत डोबिवलीतून म्हात्रे यांचा पराभव झाला. हा पराभव ईव्हीएम मशीनमुळे भोंगळ कारभारामुळे झाला आहे, असा गंभीर आरोप दिपेश म्हात्रे यांनी केला आहे. प्रतिस्पर्धी विजयी उमेदवार चव्हाण यांना मिळालेली मते आणि मताधिक्य याविषयी म्हात्रे यांनी निवडणूक आयोगाकडे चौकशीचं आवाहन केलं आहे. व्हीव्ही पॅट मशीनमधील मतं मोजण्याकरीता म्हात्रे यांनी निवडणूक यंत्रणेकडे तब्बल ४ लाख ७२ हजार रुपये



भरले आहेत, अशी माहिती समोर आली आहे. त्याचप्रमाणेच दरम्यान राज्यभरात महायुतीला मिळालेल्या अभूतपूर्व यशाच्या विषयी महाविकास आघाडीने शंका घेत ईव्हीएम मशीनमध्ये घोळ असल्याचा आरोप केला आहे. या आरोपापश्चात उद्धव सेनेकडून डोंबिवलीत आज विविध ठिकाणी बूथ लावण्यात आले आहे. त्याठिकाणी ईव्हीएम मशीनच्या विरोधात नागरीकांची स्वाक्षरी मोहीम घेतली जात आहे.

विधानसभा निवडणूकीच्या या रिंगणात महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यात अतीतटीटची लढत पाहायला मिळाली होती. या निवडणूकीत महायुती विरुद्ध महाविकास आघाडी आणि इतर पक्ष होते. इतक्या मोठ्या संख्येने महायुतीचे उमेदवार निवडून आलेच कले असा सवाल उपस्थित केला जात आहे. निकालावर नाराजी व्यक्त करणाऱ्या विरोधकांच्या आरोपांमुळे राज्यातील राजकीय समीकरणं बदलताना दिसत आहेत.

## बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा; राज्यात हलक्या पावसाचा अंदाज

● रत्नागिरी, दिगंबर जाधव :



बंगालच्या उपसागरात तयार झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे राज्यातील किमान तापमानात हळुवारपणे वाढ होत असून, १९ डिसेंबरपर्यंत राज्यात ढगाळ वातावरणासह हलक्या पावसाचा अंदाज आहे. त्यामुळे राज्यात थंडी कमी राहील, असा अंदाज हवामान शास्त्रज्ञांनी व्यक्त केला आहे.

राज्यात गेले चार ते पाच दिवस कडाक्याची थंडी पडण्यास सुरुवात झाली आहे. मात्र, बंगालच्या उपसागरातील कमी दाबाच्या पट्ट्यामुळे राज्यात ढगाळ वातावरण आणि हलक्या पावसाचा अंदाज आहे. राज्यात बाष्पयुक्त वारे वेगाने येत असल्याने हलक्या पावसाचा अंदाज आहे.

पान २ वर

## देवेंद्र फडणवीस यांनी वक्फ बोर्डाच्या निधीचा निर्णय शासन पातळीवर घेतला मागे

● मुंबई, विशाल कारंडे :

राज्यात महायुती सरकारने वक्फ बोर्डाला १० कोटी रुपयांचा निधी जाहीर केला होता. राज्य सरकारच्या अल्पसंख्याक विभागाने वक्फ बोर्डासाठी निधी जाहीर केला होता. या निर्णयाविरोधात भाजपने प्रचारादरम्यान वक्फ बोर्डाने चिंता व्यक्त केली होती. आता निवडणुकीनंतर महायुतीने मॅजिक फिगर गाठल्यानंतर भाजपचे देवेंद्र फडणवीस ॲक्शन मोडमध्ये आले आहेत. देवेंद्र फडणवीस यांनी वक्फ बोर्डाच्या निधीसंदर्भात निर्णय शासन पातळीवर मागे घेण्याची माहिती दिली.

महायुती सरकारने वक्फ बोर्डाच्या कामकाजासाठी फंड मंजूर केला होता. महाराष्ट्र सरकारने आर्थिक वर्ष २४-२५ मध्ये अल्पसंख्याकांच्या कल्याणासाठी वक्फ बोर्डासाठी १० कोटींची घोषणा केली होती. निवडणुकीआधी अल्पसंख्याक कल्याण विभागाने छत्रपती संभाजीनगरमध्ये २ कोटी रुपये दिली होते. त्यानंतर




उरलेली रक्कम निवडणुकीनंतर देण्याचं आश्वासन दिलं होतं. या मदतीला विश्व हिंदू परिषदेने विरोध केला होता. विश्व हिंदू परिषदेच्या कोकण विभागाचे मोहन साळेकर यांनी राज्य सरकारच्या निर्णयाचा विरोध केला होता. या विरोधानंतर भाजपच्या देवेंद्र फडणवीस यांनी महत्वाचा निर्णय घेतल्याची माहिती दिली आहे.

देवेंद्र फडणवीस यांनी एक्स मीडियावर पोस्ट करत सांगितलं की, 'महाराष्ट्रात काळजीवाहू सरकार असताना वक्फ बोर्डाला निधी देण्याबाबत निर्णय घेतला होता. या निधीसंदर्भात प्रशासनाने जीआर काढण्याचा प्रकार योग्य नाही.

पान २ वर

## कल्याण-डोंबिवलीतील विनामीटर वीज वापरणाऱ्यांवर महावितरणाची कारवाई

● डोंबिवली, आकाश कांबळे :

कल्याण पूर्वेकडे असलेल्या महावितरणच्या नेतिवली शाखेतील अधिकाऱ्यांनी कल्याणातील चिंचपाडा आणि डोंबिवलीतील दावडी भागातील घरांची तपासणी केली असता यावेळी परिसरातील तीन घरांमध्ये विनामीटर चोरून वीज वापरली जात असल्याचे महावितरण अधिकाऱ्यांच्या लक्षात आले. अधिकाऱ्यांनी लाखो रूपयांची वीज चोरी करणाऱ्या दोन वीज ग्राहकांविरुध्द महात्मा फुले चौक पोलिस ठाण्यात तक्रार केली. या तक्रारीनुसार पोलिसांनी विद्युत चोरी कायद्याने गुन्हे दाखल केले आहेत.

कल्याण पूर्वेतील चिंचपाडा रोडला



असलेल्या नांदिवली येथील जगन्नाथ धनावडे यांनी ऑक्टोबर २०२३ ते सप्टेंबर २०२४ या कालावधीत १४५८ युनिटची ३२ हजार ६५० रुपयांची वीज चोरी केल्याची तक्रार महावितरण अधिकाऱ्याने पोलिस ठाण्यात केली आहे. दुसऱ्या एका प्रकरणात दावडी येथील विमलेश शर्मा यांनी ३२ हजार ९४० रूपयांची गेल्या वर्षभरात, तर याच गावातील हितेश पाटील यांनी गेल्या वर्षभरात ६९ हजार ६६० रूपयांची वीज चोरी केल्याची तक्रार अधिकाऱ्यांनी दाखल केली आहे.

महावितरणच्या नेतिवली शाखेचे सहाय्यक अभियंता वैभव कांबळे यांनी पोलिस ठाण्यातील दाखल केलेल्या तक्रारीत म्हटले आहे, सप्टेंबरमध्ये आपण सहकाऱ्यांसह नांदिवली भागात वीज मीटर तपासणीसाठी गेलो होतो. तेव्हा जगन्नाथ धनावडे यांच्या घराची तपासणी करत असताना तेथे विनामीटर वीज वापर सुरू असल्याचे आढळले. त्यांच्या घरात लघुदाब वीज वाहिनीवरून काळ्या वायरच्या साह्याने आकडा टाकून वीज वापर सुरू असल्याचे आढळून आले. महावितरणचे आर्थिक नुकसान केल्याने त्यांच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

चालू महिन्यात वीज मीटर तपासणी मोहिमेत दावडी गावातील हितेश पाटील आणि विमलेश शर्मा यांनी विनामीटर घरात महावितरणच्या लघुदाब वीज वाहिनीवरून वीज पुरवठा घेतला असल्याचे महावितरण अधिकाऱ्यांच्या तपासणीत उघड झाले होते. त्यामुळे त्यांच्या विरुध्द महावितरणचे आर्थिक नुकसान केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल झालेल्या वीज ग्राहकांनी वीज देयक भरण्याची हमी दिल्याने आणि कार्यालयीन कामामुळे तक्रार दाखल करण्यास विलंब झाल्याचे अभियंता वैभव कांबळे यांनी तक्रारीत म्हटले आहे.

## विमानतळबाधितांच्या आंदोलनाला ५५ दिवस पूर्ण, सरकार आणि सिडको प्रशासनाचे दुर्लक्ष

● नवी मुंबई, भावना जैन :

वारंवार आंदोलन अर्ज, चर्चा करूनही नवी मुंबई विमानतळ बाधितांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष होत असल्याने ७ ऑक्टोबरपासून प्रकल्पग्रस्तांनी सिडको कार्यालयासमोर धरणे आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनाला ५५ दिवस पूर्ण झाले आहेत. मात्र त्यानंतरही आंदोलन सुरू असून नवीन सरकार स्थापन झाल्यानंतर चर्चा होण्याची अपेक्षा भूमिपुत्रांना आहे.

नवी मुंबई विमानतळ पूर्णत्वास जात आहे. येत्या एप्रिल २०२५ पर्यंत ते कार्यान्वित होणार आहे. मात्र




या विमानतळासाठी आपले सर्वस्व असलेल्या जमिनी आणि राहती घरे देणाऱ्या भूमिपुत्रांचे पुनर्वसन अपूर्ण आहे. यासंदर्भात १ जुलैला पनवेल ते मुंबई मंत्रालय असा पायी लाँग मार्च काढला होता. त्यावेळी राज्याचे तत्कालीन मंत्री शंभुराज देसाई यांच्यासोबत चर्चा झाली, मात्र त्यानंतर कोणत्याही प्रकारची कारवाई न झाल्याने ७ ऑक्टोबरपासून प्रकल्पबाधितांनी आंदोलन सुरू केले आहे. आपल्या मागणीसाठी हे प्रकल्पग्रस्त गेल्या पाच वर्षांपासून सातत्याने लढत आहेत. तरीही राज्य सरकार सिडको प्रशासन दुर्लक्ष करीत आहे. त्यांचे पूर्ण आणि कायद्याच्या चौकटीत योग्य पुनर्वसनाच्या मागणीसाठी नवी मुंबई आंतराष्ट्रीय विमानतळ समिती आणि अखिल भारतीय किसान सभा यांच्या संयुक्त विद्यमाने हे बेमुदत आंदोलन सुरू करण्यात आले आहे.

या आंदोलनाला जनतेकडून जाहीर पाठिंबा मिळत आहे. विमानतळ समितीचे अध्यक्ष अनिल पाटील, विशाल भोईर, किसान सभेचे रायगड जिल्हा अध्यक्ष रामचंद्र म्हात्रे, सचिव संजय ठाकूर, चांगुणा डाकी, किरण केणी यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन सुरू आहे.

नवी मुंबई विमानतळाला दि. बा. पाटील यांचे नाव द्या. बाधित झालेल्या मच्छीमारांना २०१३ च्या भूसंपादन आणि पुनर्वसन कायदा लागू करा. विमानतळबाधित दहा गावांतील १८ वर्षांवरील सर्व तरुणांना विमानतळ प्रकल्पात सामावून घेणारे रोजगार प्रशिक्षण द्या – वाघिवली गावातील प्रकल्पग्रस्तांच्या भूखंडाचे त्वरित वाटप करा.

पान २ वर

## म्हसा येथे "ग्रीन ग्रो एग्रो सोल्युशन" चा उद्घाटन सोहळा दिमाखात संपन्न

● ठाणे, रोहित जैसवार :

मुरबाड तालुक्यातील म्हसा येथे दि.२७ नोव्हेंबर २०२४ रोजी "ग्रीन ग्रो एग्रो सोल्युशन" चा उद्घाटन सोहळा दिमाखात संपन्न झाला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून मंत्रालय बँकेचे उपाध्यक्ष श्री. सुनील खाडे उपस्थित होते. त्यांच्या हस्ते फीत कापून व दीपप्रज्वलन करून दुकानाचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमास म्हसा ग्रामपंचायतीचे सरपंच प्रविण घागस, कान्होळ ग्रामपंचायतीच्या सरपंच श्रीमती पूनम जिवान शेळके, चिरड येथील श्री. जयवंत तुळशीराम कंटे, बोरिवळी येथील श्री. काळूराम दत्तु घरत तसेच नागरिक आणि ग्राहकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

" ग्रीन ग्रो एग्रो सोल्युशन " मध्ये ग्राहकांसाठी सॉइल चार्जर टेक्नोलॉजी वैदिकची उत्कृष्ट दर्जाची




शेतीसाठी लागणारी खते व औषधे उपलब्ध आहेत.दुकानाचे मालक श्री.तुषार चंद्रकांत चौधरी यांनी या यशस्वी सोहळयासाठी सर्व उपस्थितांचे आभार मानले आणि भविष्यातही दर्जेदार सेवा देण्याचा निर्धार व्यक्त केला. तसेच "ग्रीन ग्रो एग्रो सोल्युशन" ला दुकान क्र.३, अंकिता कॉन्प्लेक्स, म्हसा-मुरबाड रोड, म्हसा, तालुका - मुरबाड, जिल्हा – ठाणे येथे सकाळी ९ ते ५ या वेळेत भेट द्यावी, असे आवाहनही श्री.चौधरी यांनी केले

# कळवा- खारेगावातील जुन्या इमारतींच्या पुनर्विकासाला खीळ

## जितेंद्र आव्हाड यांचा आरोप



**ठाणे (यश सावंत) :** ठाणे महापालिका क्षेत्रासाठी तयार करण्यात आलेल्या नवीन प्रारुप विकास आराखड्याच्या माध्यमातून कळवा-खारेगाव भागातील अधिकृत जुन्या इमारतींचा पुनर्विकास रोखण्यात आल्याचा गंभीर आरोप राष्ट्रवादी (शरद पवार गट) नेते जितेंद्र आव्हाड यांनी गुरूवारी पत्रकारांशी बोलताना केला. उद्दीष्ट ठेवून तयार केलेल्या या विकास आराखड्यामुळे संपुर्ण कळवा-खारेगाव उदध्वस्त होणार असून त्याचा बोलविता धनी कोण, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला आहे. या आरोपांमुळे ठाणे महापालिकेने तब्बल २१ वर्षानंतर तयार केलेल्या ठाणे शहराचा नवीन प्रारुप विकास आराखडा वादात सापडण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत.

कळवा परिसरातील त्रिमुर्ती, सह्याद्री, सुदामा अशा अधिकृत इमारतींच्या भागातून विकास आराखड्यात रस्ते प्रस्तावित करण्यात आले आहेत. खारेगावमध्ये खूप जुनी घरे आहेत. मंदीरे आहेत. त्याठिकाणीही रस्ते प्रस्तावित करण्यात आले आहेत. काही ठिकाणी २४ मीटर तर काही ठिकाणी २० मीटरचे रस्ते प्रस्तावित करण्यात आले आहेत. अशा रस्त्यांच्या ठिकाणी नियमानुसार काही भाग सोडून इमारती उभाराव्या लागतात. परंतु उर्वरित जागेत इमारतींचा पुनर्विकास करणेच शक्य होणार नाही. त्यामुळेच नवीन प्रारुप विकास आराखड्याच्या माध्यमातून कळवा-खारेगाव भागातील अधिकृत जुन्या इमारतींचा पुनर्विकास रोखण्यात आल्याचा गंभीर आरोप आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे. ठाणे महापालिकेने विकास आराखड्यातील नागरिकांना बेघर करणारे प्रस्तावित रस्ते रद्द करावेत अन्यथा आंदोलन उभारण्यात येईल. हे एका पक्षाचे आंदोलन नसेल तर सर्वांना घेऊन हे आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

ठाणे महापालिका क्षेत्रासाठी तयार करण्यात आलेल्या नवीन प्रारुप विकास आराखड्यात कळवा-खारेगाव भागातील अधिकृत जुन्या इमारतींच्या भागातून रस्ते प्रस्तावित करण्यात आले असून यामध्ये ५०० इमारतीत बाधित होऊन ४५ हजार रहिवाशी बेघर होतील, अशी भिती आमदार आव्हाड यांनी व्यक्त केली. तिसऱ्या खाडी पुलामुळे कळवा-खारेगाव भागात सद्यस्थिती वाहतूक कोंडी होत नाही. तसेच खाडी मार्गे आणि खारेगाव येथून महामार्गाला जोडणारा रस्ता तयार करण्याचा प्रस्ताव यापुर्वीच दिला आहे. त्यामुळे भविष्यातील कोंडी कमी करायची असेल तर ते रस्ते तयार करा. परंतु ते रस्ते तयार करण्याऐवजी विशिष्ठ उद्दीष्ट ठेवून तयार करण्यात आलेल्या विकास आराखड्यामुळे संपुर्ण कळवा-खारेगाव उदध्वस्त करणार असून याचा बोलविता धनी कोण आहे असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला आहे.

**पालिकाचे नवा आराखडा वादात**

ठाणे महापालिकेच्या मंजूर विकास आराखड्याची फारशी अंमलबजावणी झाली नसल्याच्या तक्रारी पुढे येत असतानाच, ठाणे महापालिकेने तब्बल २१ वर्षानंतर ठाणे शहराच्या नवीन प्रारुप विकास आराखडा तयार केला आहे. काही दिवसांपुर्वी कळव्यातील शिवसेनेचे ज्येष्ठ नेते दशरथ पाटील यांनी नवीन विकास आराखड्यातील नियोजित रस्ता भुमिपुत्रांना उदध्वस्त करण्याबरोबरच स्वातंत्र्यसैनिकांच्या घरांवर बुलडोझर फिरविणारा असल्याचा आरोप केला होता.

हा रस्ता रद्द करण्याची मागणी करत आंदोलन करण्याचा इशारा पाटील यांनी दिला होता. त्यापाठोपाठ आता कळवा-मुंब्र्यातील राष्ट्रवादीचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनीही नवीन प्रारुप विकास आराखड्याच्या माध्यमातून कळवा-खारेगाव भागातील अधिकृत जुन्या इमारतींचा पुनर्विकास रोखण्यात आल्याचा गंभीर आरोप केल्याने हा आराखडाच वादात सापडला आहे.

# डोंबिवली पश्चिम रेल्वे स्थानकाजवळील लोखंडी सामानाचा वाहतुकीला अडथळा



**डोंबिवली (प्रथमेश चव्हाण) :** येथील पश्चिमेतील रेल्वे स्थानकाजवळील नवीन रेल्वे आरक्षण केंद्राच्या बाहेर अनेक दिवसांपासून वर्दळीच्या महात्मा गांधी रस्त्यावर लोखंडी खांब, लोखंडी पट्ट्या आणून ठेवण्यात आहेत. रिक्षा उभ्या करण्याच्या ठिकाणी हे सामान ठेवण्यात आल्याने रिक्षा चालक आणि प्रवाशांची याठिकाणी घुसमट होत आहे.

डोंबिवली पश्चिम रेल्वे स्थानकाजवळील विष्णुनगर मासळी बाजारासमोरील महात्मा गांधी रस्त्यावर हे सामान ठेवण्यात आले आहे. हे सामान कोणी आणून ठेवले आहे याविषयी कोणाला काही माहिती नसल्याने तक्रार करायची कोणाकडे असा प्रश्न पादचारी, रिक्षा चालकांना पडला आहे. रेल्वे स्थानक भागातील हा रस्ता अरूंद आहे. डोंबिवली पश्चिमेतील गणेशनगर, सरोवरनगर, देवीचापाडा, गरीबाचापाडा भागातून रिक्षेने येणारे प्रवासी या रस्त्यावर रेल्वे स्थानकात जाण्यासाठी उतरतात. लोखंडी सामानामुळे रिक्षा चालकांना वाहन रस्त्याच्याकडेला घेता येत नाही. प्रवाशांना रिक्षेतून उतरताना या सामानाचा अडथळा होतो. जड वाहने या रस्त्यावरून धावतात. या वाहनांना लोखंडी सामानाचा अडथळा येतो.

लोखंडी पट्ट्या रस्त्यावर पसरून ठेवण्यात आल्या आहेत. या पट्ट्या गुळगुळीत असल्याने या पट्ट्यांवरून जाणारे प्रवासी दररोज पाय घसरून पडतात. हे सामान रस्त्यावरून हलविण्याची रिक्षा चालकांची मागणी आहे. पण हे सामान याठिकाणी कोणी, कधी आणून ठेवले आहे. याची कोणतीही माहिती नसल्याने तक्रार कोठे करायची, असा प्रश्न रिक्षा चालकांना पडला आहे. अनेक प्रवासी या रस्त्यावरील लोखंडी सामानाविषयी तीव्र नाराजी व्यक्त करत आहेत.

मालवाहू अवजड वाहन लोखंडी सामान ठेवलेल्या रस्त्यावर आले तर या भागातून ते वाहन पुढे नेताना चालकाला कसरत करावी लागते. या कसरतीमध्ये या रस्त्यावर दररोज कोंडी होत आहे. वाहतूक पोलीसही हे सामान ठेवणाऱ्याचा शोध घेत आहेत. डोंबिवली पश्चिमेतील रस्ते वाहतूक विभागाने एक दिशा करून वाहतुकीत सुसुत्रता आणण्याचा प्रयत्न केला आहे. या पार्श्वभूमीवर महात्मा गांधी रस्त्यावरील लोखंडी सामानाने मात्र पादचाऱ्यांसह वाहन चालकांची कोंडी केली आहे.

# ठाण्यात अल्पवयीन मुली वेश्याव्यवसात

**ठाणे (विशाल पाटील) :** शहरातील वेगवेगळ्या ठिकाणी महिला आणि अल्पवयीन मुलींना फूस लावून वेश्याव्यवसाय करण्यास भाग पाडले जात असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. ठाणे पोलिसांच्या गुन्हे अन्वेषण शाखेने वेश्याव्यवसाय चालविणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करत तिघांना अटक केली आहे. अटकेत असलेल्यांमध्ये दोन महिलांचा सामावेश आहे.

पोलिसांनी त्यांच्या तावडीतून एक अल्पवयीन मुलगी आणि आठ महिलांची सुटका केली आहे. रईसा खान (४६), जोया शेख (२५) आणि युनीस शेख (४५) अशी अटकेत असलेल्यांची नावे आहेत. ठाणे शहरात महिलांना आणि अल्पवयीन मुलींना वेश्याव्यवसाय करण्यास भाग पाडले जात असल्याची माहिती ठाणे गुन्हे अन्वेषण शाखेच्या अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाकडे प्राप्त झाली होती. या माहितीच्या आधारे पोलीस निरीक्षक चेतना चौधरी यांनी गुरुवारी सायंकाळी उथळसर परिसरातील एका हॉटेलमध्ये बनावट ग्राहक पाठवून सापळा रचला. त्यावेळी पोलिसांनी रईसा, जोया आणि युनीस या तिघांना रंगेहात पकडले.

# कल्याण पूर्व टाटा नाका येथून दोन अल्पवयीन मुली बेपत्ता




**कल्याण (गणेश बागडे) :** कल्याण पूर्व येथील आडिवली ढोकळी भागातील रहिवासी असलेल्या दोन अल्पवयीन मुली रविवारी कल्याण शिळफाटा रस्त्यावरील टाटा नाका येथून बेपत्ता झाल्या आहेत. या दोन्ही मुलींना अज्ञातांनी फूस लावून पळवून नेली असल्याची तक्रार या मुलींच्या कुटुंबीयांनी मानपाडा पोलीस ठाण्यात केली आहे. गुन्हा दाखल होताच पोलिसांनी या मुलींचा शोध सुरू केला आहे.

रविवारी सकाळी अकरा वाजण्याच्या सुमारास हा प्रकार शिळफाटा रस्त्यावरील टाटा नाका भागात घडला आहे. एक मुलगी १५ वर्षाची, दुसरी मुलगी १० वर्षाची आहे. या दोघी मैत्रिणी आहेत. या दोन्ही मुली हिंदी, भोजपुरी भाषा बोलतात.

बेपत्ता झालेल्या एका मुलीच्या आईने मानपाडा पोलीस ठाण्यात याप्रकरणी तक्रार केली आहे. या तक्रारीत म्हटले आहे, आपली १५ वर्षाची मुलगी आणि तिची १० वर्षाची मैत्रिण या दोघी आडिवली ढोकळी येथील घरातून रविवारी सकाळी बाहेर पडल्या. आम्ही शिळफाटा रस्त्यावरील टाटा नाका येथे जातो असे त्यांनी घरात आईला सांगितले. सकाळी अकरा वाजता त्या टाटा नाका येथे पोहचल्या. त्यानंतर त्या घरी परतल्याच नाहीत.

त्या घरी परतल्या नाहीत म्हणुन कुटुंबीयांनी त्यांचा आडिवली ढोकळी, टाटा नाका, दावडी परिसरात शोध सुरू केला. त्या कोठेही आढळून आल्या नाहीत. या दोन्ही मुलींना अज्ञात इसमाने फूस लावून कोठेतरी पळून नेले असण्याचा संशय व्यक्त करून या मुलीच्या कुटुंबियांनी मानपाडा पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे. पोलिसांनी तातडीने गुन्हा दाखल करून या मुलींचा शोध सुरू केला आहे.

पोलीस निरीक्षक राम चोपडे, साहाय्यक पोलीस निरीक्षक सागर चव्हाण यांनी तातडीने घटनास्थळी भेट दिली. साहाय्यक पोलीस निरीक्षक शिवाजी बडे याप्रकरणाचा तपास करत आहेत. याप्रकरणाच्या अधिक माहितीसाठी साहाय्यक पोलीस निरीक्षक बडे यांना संपर्क साधला असता, त्यांच्याकडून प्रतिसाद मिळाला नाही.

# तोतया पोलिसांकडून डोंबिवली पलावातील सेवानिवृत्ताची ७४ लाखाची फसवणूक

**डोंबिवली (सम्यक कासारे) :** आपल्या आधारकार्ड क्रमांकाचा वापर करून अन्य इसमाने काही गैरव्यवहार केले आहेत. आपण ऑनलाईन मटक्याच्या माध्यमातून दोन कोटी रूपये कमवले आहेत. आपण गुन्हेगार आहात, अशा धमक्या देत मुंबईतून बोलणाऱ्या दोन तोतया पोलीस अधिकाऱ्यांनी डोंबिवली जवळील पलावा गृहसंकुलात राहणाऱ्या एका ६९ वर्षाच्या सेवानिवृत्ताची ७४ लाख रूपयांची फसवणूक केली आहे.

एका परदेशी कंपनीतून हे गृहस्थ वरिष्ठ पदावरून निवृत्त झाले आहेत. ते पलावा येथे पत्नीसह राहतात. काही दिवसापूर्वी या निवृत्त व्यक्तीला मोबाईलवर एका व्यक्तीने संपर्क केला. मी मुंबईतील एका पोलीस ठाण्यातून वरिष्ठ पोलीस निरीक्षक बोलतो. तुम्ही नवीन मोबाईल सीमकार्ड घेतले आहे. या कार्डसाठी तुम्ही वापरलेल्या आधारकार्डच्या माध्यमातून अन्य एका इसमाने गैरव्यवहार केले आहेत. असे बोलत तोतया पोलीस अधिकाऱ्याने सेवानिवृत्ताला गोंधळून टाकले. तुम्ही केलेल्या गैरव्यवहार प्रकरणाची तक्रार आमच्याकडे चौकशीसाठी आली आहे. या प्रकरणात आम्ही तुम्हाला सर्वोच्च न्यायालयाची नोटीस पाठवत आहोत. तुम्हाला अटक करण्याचा हुकूम आमच्याकडे आहे. आणि तुम्हाला अटकही करू शकतो, असे दुसऱ्या एका तोतया पोलीस अधिकाऱ्याने सेवानिवृत्ताला सांगितले.

# केडीएमसीच्या ‘अ’ व ‘ह’ प्रभागातील अनधिकृत बांधकामांवर निष्कासनाची धडक कारवाई



**कल्याण (आकाश कांबळे) :** कल्याण डोंबिवली महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड यांच्या निर्देशानुसार, अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाचे उपायुक्त अवधुत तावडे यांच्या मार्गदर्शनाखाली अ प्रभागाचे सहा. आयुक्त संदिप रोकडे यांनी टिटवाळा, गणेशवाडी येथील सुरु असलेल्या एकूण ४ अनधिकृत रुम्सच्या बांधकामावर निष्कासनाची धडक कारवाई केली. हि कारवाई अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागातील कामगार यांच्या सहाय्याने करण्यात आली.

त्याचप्रमाणे ह प्रभागातही सहा.आयुक्त राजेश सावंत यांनी डोंबिवली (पश्चिम) कोपर गांव चारुबामा शाळेजवळील तळ + २ मजली अनधिकृत इमारतीच्या बांधकामावर निष्कासनाची धडक कारवाई केली. हि कारवाई अनधिकृत बांधकाम विभागातील कर्मचारी, महापालिका पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्या मदतीने आणि १ पोकलेन व कामगार यांच्या सहाय्याने करण्यात आली.

# ६३व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेचे कल्याण केंद्रात शानदार उद्घाटन




**कल्याण (विवेक गुंजाळ) :** २७ नोव्हेंबर पासून आचार्य अत्रे रंगमंदिर येथे महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेस मोठ्या उत्साहात सुरुवात करण्यात आली. उद्घाटन सोहळ्याप्रसंगी प्रथम उपस्थित मान्यवरांच्या हस्ते नटराज पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. सुकांत जावडेकर व सुप्रिया जावडेकर यांनी सुस्वर अशी नांदी गात नटराज पूजनाचा कार्यक्रम करण्यात आला. उद्घाटन सोहळ्यानंतर डोंबिवलीच्या श्री गणेश एज्युकेशन सोसायटीच्या बागी या नाट्यप्रयोगाने स्पर्धेची सुरुवात करण्यात आली.

यावेळी व्यासपीठावर आचार्य अत्रे रंगमंदिरचे माजी व्यवस्थापक गजानन कराळे, नाट्यपरिषद उपाध्यक्षा भारती ताम्हणकर, अखिल भारतीय नाट्य परिषद कल्याण शाखेचे अध्यक्ष रवींद्र सावंत, कल्याण शाखेच्या बालरंगभूमी परिषद अध्यक्षा सुजाता कांबळे, गायन क्षेत्रातील कलाकार लीना घोसाळकर, नाट्य समीक्षक बबलू दळवी, राज्य नाट्य स्पर्धेचे समन्वयक शिवाजी शिंदे, सांस्कृतिक कार्य संचालनाचे अधीक्षक संदीप वसावे, नाट्य स्पर्धेचे परीक्षक सुरेश बारसे, दिग्दर्शक राजा राजेशचंद्र, शोभना मयेकर, ज्येष्ठ रंगकर्मी मंगला जोशी आदी मान्यवर उपस्थित होते. त्याचबरोबर अनुराग नाट्य संस्था कल्याण या संस्थेने पन्नास वर्षे पूर्ण केल्याबद्दल संस्थेतील कलाकारांचा आणि नाट्य स्पर्धेचे उत्कृष्ट आयोजन करणारे शिवाजी शिंदे यांचा सन्मान करण्यात आला.

या उद्घाटन सोहळ्यात शिवाजी शिंदे यांनी प्रेक्षक, नाट्य स्पर्धक व नाट्य संस्था यांना संबोधताना असे सांगितले की, कलाकार व संस्थांनी बक्षीस मिळणार नाही म्हणून नाट्यप्रयोग करायचे नाही असे त्यांचे मत काढून टाका, कारण ही नाट्यस्पर्धा रंगकर्मिसाठी एक महोत्सव आहे, त्याकडे स्पर्धा म्हणून पाहू नका तर महोत्सव म्हणून पहा. अशा स्पर्धा भारतातील कोणत्याही राज्यात होत नाहीत मात्र महाराष्ट्र राज्य असे आहे की गेली ६३ वर्ष राज्यात कोणाचेही सरकार असू द्या पण या स्पर्धा चालू ठेवण्याचे कार्य सांस्कृतिक कार्य संचालनायातर्फे चालू आहे.

# मुरबाड औद्योगिक क्षेत्रात सध्याच्या घडीला साधारपणे ३१५ कारखाने सुरू! तर २०० कारखाने बंद अवस्थेत! डि, झोनची अत्यंत गरज!

**मुरबाड (रोहित जैसवार) -** मुरबाड औद्योगिक क्षेत्रांमध्ये जवळपास ५२५ कारखाने आहेत परंतु सध्याच्या घडीला मुरबाड औद्योगिक क्षेत्रातील २०० कारखाने बंद तर ३१५ कारखाने सुरू आहेत, अतिरिक्त कुरवली उद्योग क्षेत्रातील ५० कारखाने साधारणपणे सुरू आहेत. अशी माहिती मुरबाड मॅन्युफॅक्चर असोसिएशनचे नवनिर्वाचित अध्यक्ष मुकेश उतमणी यांनी दिली आहे. त्यामुळे मुरबाड उद्योग क्षेत्रामध्ये आताच्या घडीला ६० कारखाने टक्के चालू आहे तर ४० टक्के कारखाने सध्याच्या घडीला बंद अवस्थेत असल्याचे चित्र दिसून येत आहे.



त्यामुळे मुरबाड तालुक्यातील स्थानिक कामगारावर मोठ्या प्रमाणात उपासमारीची वेळ आली असल्याचे चित्र समोर येत आहे.

मुरबाड औद्योगिक क्षेत्रामध्ये महावितरंणाचे रेट मोठ्या प्रमाणात असल्याने तसेच औद्योगिक क्षेत्रातील कारखान्यांना भरमसाठ बिले येत आहेत त्यामुळे बहुतांशी कारखाने महावितरण कंपनीच्या पावर रेटममुळे कारखाने डबघाईस आले आहेत परंतु महावितरण कंपनीकडून कारखान्यांना प्रति युनिट अकरा रुपये आकारले जातात त्याऐवजी जर महावितरण कंपनीने दोन रुपये पावरचा रेट कमी केला तर काही प्रमाणात पुन्हा एकदा मुरबाड औद्योगिक क्षेत्रातील कारखाने चालू होतील.

**मुरबाड औद्योगिक क्षेत्रामध्ये डी, झोनची अत्यंत गरज आहे**

मुरबाड -कल्याण रेल्वे सुद्धा सुरू होणे फार गरजेचे आहे कारण दळणवळण साठी या समस्या भेडसावत आहेत त्यामुळे काही कारखाने बाहेरचे राज्यात स्थलांतर होत असल्याचे चित्र आपल्यासमोर दिसून येत आहे म्हणून येत्या काही काळात मुरबाड उद्योग क्षेत्रामध्ये सन २०२५ मध्ये औद्योगिक प्रदर्शन भरवण्यात येणार आहे त्यामध्ये मुरबाड औद्योगिक क्षेत्रातील समस्यावर चर्चा होणार असल्याची माहिती मुरबाड मॅन्युफॅक्चर असोसिएशनचे अध्यक्ष मुकेश उतमणी यांनी दिली आहे .

## मुरबाड औद्योगिक क्षेत्र डी-झोन जाहीर करणे

- कल्याण मुरबाड वाया टिटवाळा उपनगरीय रेल्वे सेवा लवकरात लवकर सुरू करणे
- कल्याण मुरबाड राष्ट्रीय महामार्ग चे काम वर्षभरात पूर्ण करणे व चौपदरीकरण माळशेज घाटापर्यंत वाढविणे आवश्यक आहे.
- सरळगाव मध्ये नव्याने औद्योगिक क्षेत्र विकसित करणे आवश्यक आहे
- इतर राज्यांच्या तुलनेने महाराष्ट्राचे वीज दर खूपच जास्त असल्यामुळे कारखानदारांना अनंत अडचणींचा सामना करावा लागत आहे.

**- मुकेश उतमणी, अध्यक्ष, मुरबाड मनुफॅक्चर असोसिएशन**

# महाराष्ट्रातील शेतकरी कुटुंबातील मुलाची कान्स फिल्म फेस्टिवलपर्यंत मजल; रोहित कोकाटे प्रवासाबद्दल म्हणाला, "जन्म झाल्यापासून"

'डेट विथ सई', 'बोगदा', 'कौल-ए कॉलिंग', 'वाय', 'बाली', 'जीव झाला वेडापिसा', 'मी पुन्हा येईन', 'समायरा' अशा अनेक चित्रपटांतून प्रेक्षकांच्या भेटीला येणारा अभिनेता म्हणजे रोहित कोकाटे( Rohit Kokate). 'द शेमलेस' या चित्रपटामुळे त्याची मोठी चर्चा होताना दिसली. कान्स महोत्सवात या चित्रपटाच्या टीमने हजेरी लावल्याचे पाहायला मिळाले.आता एका मुलाखतीत अभिनेत्याने कान्स महोत्सवाचा अनुभव कसा होता, यावर मत व्यक्त केले आहे.

अभिनेता रोहित कोकाटेने नुकतीच 'अल्ट्रा मराठी बझ'ला मुलाखत दिली. यावेळी कान्स महोत्सवात जाण्याचा अनुभव कसा होता, या प्रश्नाचे उत्तर देताना अभिनेत्याने म्हटले, "कान्सचा अनुभव खूपच छान होता. खूप आधीपासून कान्स, बर्लिन फिल्म फेस्टिव्हल बघत आलो. प्रत्येक कलाकाराचं स्वप्न असतं. हा चित्रपट झाला तेव्हा असं काही वाटलं नव्हतं की, हा चित्रपट निवडला जाईल आणि 'कान्स'ची संधी मिळेल. आतापर्यंत मी भारताबाहेर कधीच गेलो नाही. मी पहिल्यांदाच गेलो आणि 'कान्स'साठी गेलो ही माझ्यासाठी पहिली गोष्ट आहे. एक अभिनेता आणि माणूस म्हणून वेगवेगळ्या गोष्टी शिकता आल्या. वेगवेगळ्या देशांतील चित्रपट निर्माते, दिग्दर्शकांच्या ओळखी झाल्या. मला मनापासून वाटते की, प्रत्येक कलाकाराच्या आयुष्यात अशी संधी यावी."

एका शेतकरी कुटुंबातील मुलाला असे का वाटले की, अभिनय क्षेत्रात आपण जावे? त्यावर बोलताना रोहित कोकाटेने म्हटले, "जन्म झाल्यापासून चार-पाच वर्षांचा झाल्यानंतर मला कळायला लागलं तेव्हापासून मी टीव्ही बघतोय. मग नंतर भाषा शिकलो. हिंदी हळूहळू कळायला





लागलं. मी एकही फिल्म सोडत नव्हतो. शाळा-कॉलेजमध्ये असताना सगळे चित्रपट बघायचो. जेव्हा मी शिक्षणासाठी पुण्यात आलो. तेव्हा कळलं की, थिएटर वगैरे गोष्टी शिकवल्या जातात. २००४-०५ या काळात मॉडेलिंग खूप ट्रेंडिंग होतं. जॉन अब्राहम वगैरे आधी मॉडेल होते; मग हिरो व्हायचे. मग असं वाटायचं की, अभिनेता होण्यासाठी हेच केलं पाहिजे. नंतर मला एकानं सांगितलं की, अरे हे उपयोगाचं नाहीये, तर तुला अभिनय कार्यशाळा करावी लागेल. मी म्हटलं की, मला यात इंटरेस्ट नाहीये, मला हिरो व्हायचं आहे. मग मी पुण्यात पीडीए नावाची संस्था आहे. तिथे मी कार्यशाळा केली. तिथून माझा प्रवास सुरू झाला."

घरच्यांनी या क्षेत्रात जाण्यासाठी परवानगी कशी दिली? यावर बोलताना अभिनेत्याने म्हटले, "माझी एक एकांकिका होती. ती बघायला मी मावशी-काकांना बोलावलं होतं. काकांनी पप्पांना सांगितलं की, चांगलं करतोय पोरगं; करू दे. मग त्यांनीसुद्धा परवानगी दिली. पण त्यांची इच्छा अजूनही नाहीये की, मी यामध्ये काम करावं. त्यांचं म्हणणं आहे की, तू गावी ये आणि नोकरी, व्यवसाय काय करायचं ते कर."

पुढे रोहितने, "मी साधारण कॉलेजच्या दुसऱ्या-तिसऱ्या वर्षापर्यंत तोतरं बोलायचो आणि त्यात मला हिरो व्हायचं होतं. शाळेत उत्तर द्यायला उठलो की, वर्ग हसायचा. त्यामुळे त्यावर काम करायला मला अडीच-तीन वर्षं लागली. न्यूनगंड होता. बोलत नव्हतो. ठरावीक चार मित्रांच्यात बोलायचो. घरी बोलायचो. नाटकात, टीव्हीमध्ये एका विशिष्ट पद्धतीनं बोलायला लागतं. त्यामुळे करिअरच्या सुरुवातीच्या काळात मला नकारच नकार मिळायचे. नंतर काम मिळत गेलं; पण भूमिका छोट्या असायच्या. मग एकदा सुटीसाठी घरी गेलो होतो. घरच्यांनी ठरवलेलं की, आता रोहित आला की, त्याला परत पाठवायचं नाही. त्याच वेळी मला दोन चित्रपट मिळाले," असे म्हणत अभिनेत्याने करिअरची सुरुवात कशी झाली याबद्दल वक्तव्य केले आहे.

दरम्यान, अभिनेता रोहित कोकाटेने त्याच्या अभिनयातून प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. तो अनेकविध चित्रपट, वेब सीरिज या माध्यमांतून प्रेक्षकांच्या भेटीला येताना दिसतो.

# IFFI मध्ये नवज्योत बांदिवडेकरचा सन्मान! 'घरत गणपती'साठी सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक पदार्पण पुरस्काराने सन्मानित

यावर्षी रिलीज झालेल्या 'घरत गणपती' सिनेमाची चांगलीच चर्चा झाली. माऊथ पब्लिसिटीच्या जोरावर सिनेमा लोकांच्या पसंतीस उतरला. ५५ व्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात (IFFI 2024) 'भारतीय फिचर चित्रपट पुरस्कार' विभागात 'घरत गणपती' या मराठी चित्रपटासाठी दिग्दर्शक नवज्योत बांदिवडेकर यांना पदार्पणातील सर्वोत्कृष्ट दिग्दर्शकाचा पुरस्कार देण्यात आला. प्रमाणपत्र आणि पाच लाख रुपये रोख, असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

'पहिल्याच चित्रपटाला मिळालेला प्रेक्षकांचा प्रतिसाद व पुरस्काराची पोचपावती भारावणारी असल्याची प्रतिक्रिया दिग्दर्शक नवज्योत बांदिवडेकर यांनी व्यक्त केली. एक छान कौटुंबिक कथा व भारतीय संस्कृतीचे दर्शन 'घरत गणपती' चित्रपटाच्या माध्यमातून आम्ही दाखविले, त्या चित्रपटाचं आज विविध स्तरावर खूप कौतुक होताना दिसतंय', याचा अभिमान असल्याचंही दिग्दर्शक नवज्योत बांदिवडेकर सांगतात.

गोव्यात संपन्न झालेल्या यंदाच्या इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल ऑफ इंडियामध्ये (इफ्फी)भारतीय फिचर चित्रपट पुरस्काराच्या यादीत पहिल्यांदाच सर्वोत्कृष्ट दिग्दर्शकीय पदार्पण हा विभाग जाहीर करण्यात







आला. या पुरस्कारासाठी सात चित्रपट स्पर्धेत होते. पुरस्काराच्या या स्पर्धेत ' घरत गणपती' चित्रपटाने आपली मोहोर उमटवली. 'घरत गणपती' सिनेमात भूषण प्रधान, निकिता दत्ता, शुभांगी गोखले, अश्विनी भावे, अजिंक्य देव, संजय मोने या कलाकारांनी प्रमुख भूमिका साकारल्या.

# शिल्पा शेट्टी आणि राज कुंद्रा पुन्हा अडचणीत, घर आणि ऑफिसवर ईडीची धाड

प्रसिद्ध अभिनेत्री शिल्पा शेट्टी आणि तिचा पती राज कुंद्रा यांच्या अडचणी वाढल्या आहेत. शिल्पा शेट्टी आणि राज कुंद्रा या दोघांच्या घरावर आणि ऑफिसवर ईडीची धाड पडली आहे. जुहू येथील घर आणि ऑफिसवर ही धाड पडली आहे त्यामुळे या दोघांच्या मागे सुरु असलेलं शुक्लकाष्ठ काही संपता संपत नाही अशी स्थिती आहे.

पोर्नोग्राफी नेटवर्क प्रकरणात ईडीने ही कारवाई करत धाड टाकली आहे. ईडीने गुन्हा दाखल केल्यानंतर आता शिल्पा आणि राज कुंद्रा यांचं घर तसेच ऑफीसची झडती घेतली जात आहे. 'अश्लील' चित्रपट बनवल्याप्रकरणी राज कुंद्रा याला जून २०२१ मध्ये अटक करण्यात आली होती. कुंद्रा हा या प्रकरणातील मुख्य सूत्रधार असल्याचा दावा मुंबई पोलिस अधिकाऱ्यांनी केला होता. दोन महिने तुरुंगात घालवल्यानंतर सप्टेंबर २०२१ मध्ये त्याला जामीन मिळाला आणि तो बाहेर पडला.

राज कुंद्रा आणि त्याच्या कंपनीने पॉर्न फिल्म्सद्वारे फक्त बक्कळ कमाई केली नाही तर त्यांनी देशाच्या कायद्यांना बगल देण्यासाठी संपूर्ण व्यवस्था केली होती, असा दावा पोलिसांनी केला



होता. पण हे प्रकरण उघडकीस आलं तरी कसं ? मुंबई पोलिसांनी यासंदर्भात ४ फेब्रुवारी २०२१ मध्ये एक केस दाखल केली होती. मालवणी पोलिस स्टेशनमध्ये या रॅकेटसंदर्भात एका मुलीने तक्रार दाखल केल्यानंतर ही कारवाई करण्यात आली होती.

चित्रपट आणि ओटीटीवर काम मिळवून देण्याच्या नावाखाली काही लोक तरूणींना अश्लील चित्रपटात काम करण्याची जबरदस्ती करत आहेत, असे या तक्रारीत नमूद करण्यात आलं होतं. मुंबईतील अनेक व्यावसायिक अश्लील चित्रपटांचे शूटिंग करून मोठी कमाई करत आहेत असा दावाही या तक्रारीत करण्यात आला होता. त्यानंतर पोलिसांनी मालाड वेस्टमधील एका बंगल्यावर छापा मारला.

# प्राजक्ता माळीची 'फुलवंती'साठी खास पोस्ट; शेअर केल्या आठवणी

मराठमोळी अभिनेत्री प्राजक्ता माळीचा ड्रीम प्रोजेक्ट म्हणजेच 'फुलवंती' सिनेमा ५० दिवसांपासून सिनेमागृहात सुरु आहे. बाबासाहेब पुरंदरेंच्या 'फुलवंती' या कादंबरीवर सिनेमा आधारित आहे.य या सिनेमासाठी तिने खूप कष्ट घेतले. प्रवीण तरडेंनी सिनेमाची निर्मिती केली तर त्यांची पत्नी स्नेहल तरडेने या सिनेमातून दिग्दर्शनात पाऊल ठेवलं. 'फुलवंती'ला मिळालेल्या या अभूतपूर्व यशाबद्दल प्राजक्ताने खास पोस्ट शेअर करत भावना व्यक्त केल्या आहेत.

'फुलवंती' सिनेमाचा प्रवास म्हणजेच सुरुवात ते शेवटपर्यंतच्या सगळ्या आठवणींचा एक व्हिडिओच तिने सोशल मीडियावर शेअर केला आहे. सिनेमा साईन



करण्यापासून ते प्रमोशन, रिव्ह्यू पर्यंतचा सगळा प्रवास तिने दाखवला आहे. यासोबत प्राजक्ता लिहिते, "मागे वळून पाहताना... (अथ ते इति पर्यंत- महत्वाचे गोड टप्पे.) आज 'फुलवंती'ला चित्रपटगृहात ५० दिवस पुर्ण झाले. (पुढे प्रवास चालूच आहे.) हल्ली इतर अनेक माध्यमांमुळे, सोशल मीडियासारख्या असंख्य गोष्टींमुळे, खूप कमी चित्रपटांच्या नशिबात हा सुदिन येतो. आम्ही खरेच भाग्यवान.. (लवकरच पार्टी करणार आहोत.) ह्या यशासाठी तमाम महाराष्ट्राचे मनापासून आभार. तुमची ऋणी आहे."

'फुलवंती' सिनेमा ११ ऑक्टोबर रोजी संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित झाला. अजूनही काही ठिकाणी हा सिनेमा सुरुच आहे. प्राजक्ता, गश्मीर महाजनी आणि इतर कलाकारांनी सिनेमात अप्रतिम काम केलं.

# हिवाळ्यात शिंगाडा खाण्याचे फायदे जाणून घ्या...

१.पचनक्रिया चांगली राहते


शिंगाडामध्ये भरपूर फायबर असते, त्यामुळे पचनक्रिया निरोगी राहते. शिंगाडा खाल्ल्याने आतड्याची हालचाल सुधारते आणि पचनाचे आरोग्य चांगले राहते.

२. हायड्रेशन -

शिंगाडा हे उच्च पाण्याचे प्रमाण असलेले अन्न आहे. शिंगाडा खाल्ल्याने शरीराला पोटॅशियम चांगल्या प्रमाणात मिळते जे शरीराला हायड्रेट ठेवण्यास मदत करते. जर शरीरात पाण्याची कमतरता असेल तर तुम्ही विशेषतः शिंगाडा नक्की खा.

३. त्वचेसाठी फायदेशीर -

शिंगाडा त्वचेसाठी खूप



फायदेशीर आहे. यामध्ये भरपूर प्रमाणात अँटी-ऑक्सिडेंट असतात जे त्वचेला नुकसान करणाऱ्या फ्री रॅडिकल्सला दूर ठेवतात. याशिवाय त्वचेचा घट्टपणा वाढवण्यासाठी, कोरडेपणा दूर करण्यासाठी आणि त्वचा चमकदार करण्यासाठी देखील शिंगाडा खाऊ शकता.

४. रक्तदाब नियंत्रित होतो

उच्च रक्तदाबाचा त्रास असलेले लोक त्यांच्या आहारात शिंगाडा समाविष्ट करू शकतात. शिंगाडामध्ये भरपूर पोटॅशियम असते आणि ते सोडियमचे प्रमाण संतुलित करण्यासाठी प्रभावी असतात. शिंगाडाचे पाणी खाल्ल्याने रक्तदाब कमी होण्यास मदत होते आणि हृदय निरोगी राहते.

५. रोगप्रतिकार शक्ती मजबूत होते


शरीराची प्रतिकारशक्ती मजबूत करण्यासाठी शिंगाडा खाल्ले जाऊ शकते. शिंगाडाचे पाणी खाल्ल्याने शरीराला व्हिटॅमिन सी चांगल्या प्रमाणात मिळते जे रोग प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी प्रभावी आहे. याशिवाय सर्दी-खोकला यांसारख्या मौसमी समस्यांनाही शिंगाडा दूर ठेवते.

# सकाळी सूर्यप्रकाशात बसल्यास आरोग्याला होतात अफाट फायदे

हिवाळयात कडाक्याच्या थंडीमध्ये अनेकांना उन्हात बसायला आवडते. परंतु, धावपळीच्या जीवनशैलीमुळे अनेकांना उन्हात बसणे शक्य होत नाही. तर कुणी त्वचा काळी पडेल या भीतीनं उन्हात बसणं टाळतात. पण तुम्हाला माहिती आहे का? त्वचा आणि संपूर्ण शरीर निरोगी ठेवण्यासाठी सकाळची सूर्यकिरणे फार महत्त्वाची भूमिका बजावतात.

सकाळी उन्हात बसल्यास रोगप्रतिकार शक्ती सुधारते. तसंच 'व्हिटॅमिन डी' मिळवण्यासाठी आणि स्नायू बळकट करण्यासाठी सूर्यप्रकाश फार महत्त्वाचा आहे. याशिवाय ज्यांना झोपेसंबंधित समस्या आहे त्यांच्यासाठी सूर्यप्रकाश उत्तम उपाय आहे.

शरीराला आवश्यक असलेला 'व्हिटॅमिन डी' सर्वात जास्त सूर्याच्या किरणांपासून मिळतो. निरोगी जीवनशैलीसाठी सूर्यप्रकाश फायदेशीर आहे. यामुळे शारीरिकच नाही तर



मानसिक आरोग्य देखील सुधारतं.

हिवाळयामध्ये अनेकांना सूर्यप्रकाश इतका भावतो की, लोक तासनतास उन्हात बसतात. परंतु, यामुळे काही दुष्परिणाम होऊ शकतात. जास्त वेळ उन्हात राहिल्यास त्वचेवर ठिपके, डाग तसंच सुरकुत्या येऊ शकतात. तुम्ही हिवाळयाच्या दिवसांमध्ये सकाळी ८ ते ११ या दरम्यान सूर्यप्रकाश घ्या. हिवाळयाच्या दिवसांत 'व्हिटॅमिन डी' मिळवण्यासाठी सकाळी ११ ते दुपारी २ या दरम्यान सूर्यप्रकाश घ्यावा.

जास्तीत जास्त फायदे मिळवण्यासाठी सकाळी २० ते ३० मिनिटं सूर्यप्रकाश घ्यावा. जास्तवेळी सूर्यप्रकाशात बसणे हानिकारक ठरू शकते.

सूर्यप्रकाश घेताना त्वचेचं संरक्षण करण्यासाठी कपडे नीट घाला. तसेच त्वचेवर सनस्क्रीन लावणे आवश्यक आहे.

सूर्यप्रकाशामुळे इम्यूनिटी बूस्ट होते. तुम्ही सूर्यप्रकाशात राहिल्यास कमी वेळात इम्यूनिटी बूस्ट करू शकता. इम्यूनिटी मजबूत झाल्यास तुम्ही अनेक आजारांपासून स्वतःचा बचाव करू शकता.

सकाळी चांगला सूर्यप्रकाश घेतल्यामुळे झोपेची गुणवत्ता सुधारते. तुम्ही जेवढा वेळ उन्हात घालवाल, तेवढे जास्त शरीरात मेलाटोनिनचं उत्पादन होईल. यामुळे तुम्हाला झोप चांगली येईल. मानसिक आरोग्य सुधारते: सकाळी थोडा वेळ सूर्यप्रकाश घेतल्यास मानसिक आरोग्य सुधारते. सूर्यप्रकाशातील मेलाटोनिन, डोपामाइन आणि सेरोटोनिन तुमच्या मानसिक आरोग्यासाठी फायदेशीर आहे. तसंच सूर्यप्रकाशामुळे चिंता तसंच नैराश्याचा धोकाही कमी होतो.




**मेष** – अधिक खर्च होणार नाही याचे भान ठेवा. जुनी येणी वसूल होतील. आरोग्य जपा. महत्त्वाचे काम करण्यात आळस करू नका.

**वृषभ** – प्रयत्नांना चांगला प्रतिसाद मिळेल. मानसिक, शारीरिक परिश्रम अधिक होतील. वाहन जपून चालवा. धंद्यात काम मिळेल.

**मिथुन** – धंद्यातील चर्चा यशस्वी होईल. आपण ठरवलेले काम पूर्ण करता येईल. मुलांची चिंता सतावेल. मान-सन्मान मिळेल.

**कर्क** – जोडीदारासोबत वेळ घालवाल. तुमच्या कामाची प्रशंसा होईल. शक्य असल्यास वाद टाळा. कार्याला योग्य दिशा मिळेल.

**सिंह** – वरिष्ठांच्या सहकार्यानेच वागावे लागेल. अधिक परिश्रमाची कामे टाळा. मानसिक शांतता लाभेल. प्रवासाचे नियोजन कराल.

**कन्या** – नवा परिचय होईल. आरोग्य उत्तम राहील. प्रतिस्पर्ध्यांसोबत एखाद्या गहन चर्चेत सहभागी होऊ नका. खरेदी कराल.

**तूळ** – नोकरीत कामाचा आळस करू नका. आपले वरिष्ठ प्रसन्न होतील. बोलण्यामुळे गैरसमज होणार नाहीत याचे भान ठेवा.

**वृश्चिक** – नवीन ओळखीचा उपयोग होईल. रचनात्मक आणि कलात्मक शक्तीला चालना मिळेल. तक्रारीला वाव देऊ नका.

**धनु** – मौजमजेसाठी पैसे खर्च होण्याची शक्यता आहे. काहीतरी नवनिर्मिती कराल. वाद-विवादात पडू नका. घरगुती कामे होतील.

**मकर** – नोकरीत आपले वर्चस्व राहील. घरात क्षुल्लक कारणावरून तणाव होईल. आर्थिक बाबतीत व्यवस्थित योजना तयार कराल.

**कुंभ** – रेंगाळलेली कामे पूर्ण होतील. मैत्रीत वाढ होईल. वरिष्ठांपासून सांभाळून राहा. गृहस्थ जीवनाचा पूर्ण आनंद घ्याल.

**मीन** – कोर्टाच्या कामाला दिशा मिळेल. नातेवाईकांसोबत वादाचे प्रसंग येतील. वैचारिक दृढतेमुळे कामे चांगल्या रीतीने पूर्ण कराल.

# दिव्यांग व्यक्तींनी समाज कल्याण विभागाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा

**ठाणे (रोहित जैसवार) -** समाज कल्याण विभागामार्फत दिव्यांग व्यक्तींकरिता विविध योजना राबविण्यात येतात. यांतर्गत समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद ठाणे यांच्यामार्फत दिव्यांग विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना तसेच 18 वर्षांवरील दिव्यांग व्यक्तींसाठी अपंग-अव्यंग व्यक्तींच्या विवाहास प्रोत्साहन देण्यासाठी आर्थिक सहाय्य योजना, दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी आार्थिक लाभ (बीजभांडवल योजना) व शालांत पूर्व शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत आहेत.



**अपंग-अव्यंग व्यक्तींच्या विवाहास प्रोत्साहन देण्यासाठी आर्थिक सहाय्य योजना:**

या योजनेंतर्गत लाभार्थ्यास 50 हजार रुपयांचे आर्थिक सहाय्य मिळणार आहे. या योजनेस पात्र होण्याकरिता एक दिव्यांग व्यक्ती 40 टक्केच्यावर दिव्यांग असणे आवश्यक आहे. दोघांपैकी एक सुदृढ व्यक्ती असावा तसेच विवाह नोंदणी दाखला आवश्यक असून हा अर्ज विवाह झाल्यानंतर एक वर्षाच्या आत सादर करणे आवश्यक आहे.

**दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी आार्थिक लाभ (बीजभांडवल योजना):**

या योजनेंतर्गत लाभार्थ्यास 1 लाख 50 हजार रुपयांचे आर्थिक सहाय्य मिळणार आहे. या रक्कमेच्या 30 टक्के रक्कमेचा लाभ सबसिडी म्हणून दिला जातो. या योजनेस पात्र होण्याकरिता दिव्यांग व्यक्ती किमान 40 टक्के दिव्यांग असणे आवश्यक आहे. दिव्यांग व्यक्ती 18 ते 50 वर्षे या वयोगटातील असावा. 1 लाख 50 हजार रुपये पर्यंतचे कोटेशन आवश्यक आहे. तसेच अर्जदाराचे वार्षिक उतपन्न 1 लाखाच्या आत असणे आवश्यक आहे.

**शालांत पूर्व शिष्यवृत्ती योजना:**

या योजनेंतर्गत इयत्तेनुसार दरमहा 100 ते 150 विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाते. या योजनेस पात्र होण्याकरिता दिव्यांग व्यक्ती किमान 40 टक्के दिव्यांग असणे आवश्यक आहे. दिव्यांग व्यक्ती इयत्ता 1 ली ते 10 वी मध्ये शिकणारा असावा तसेच शाळेकडून दिव्यांग शिष्यवृत्तीचे अर्ज करणे आवश्यक आहे.

तरी ठाणे जिल्ह्यातील पात्र दिव्यांग व्यक्तींनी समाज कल्याण विभागाच्या या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे उज्वला वसंत सपकाळे यांनी केले आहे.

# दहशतवादी गटाला मदत केल्याप्रकरणी तीन बांगलादेशींना पाच वर्षांची शिक्षा

**मुंबई (राकेश गायकवाड) :** दहशवादी संघटना अल-कायदाची आघाडीची संघटना असलेल्या अन्सारुल्ला बांगला टीमच्या (एबीटी) सदस्यांना मदत केल्याच्या आरोपाप्रकरणी तीन बांगलादेशी नागरिकांना विशेष न्यायालयाने गुरुवारी पाच वर्षांच्या कारावासाची शिक्षा सुनावली.



मोहम्मद हबीबुर रहमान हबीब, हन्नान अन्वर हुसैन खान आणि मोहम्मद अझरअली सुभानल्ला यांना भारतीय दंड संहिता आणि परदेशी कायद्याच्या संबंधित कलमांतर्गत दोषी ठरविण्यात आले. ऑक्टोबर २०२३ मध्ये, न्यायालयाने या प्रकरणात आणखी दोन आरोपींना दोषी ठरवले होते व त्यांनाही पाच वर्षांच्या कारावासाची शिक्षा सुनावली होती.

पोलिसांनी दाखल केलेल्या गुन्ह्यानुसार, अनेक बांगलादेशी नागरिक वैध कागदपत्रांशिवाय राहत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पुणे पोलिसांनी मार्च २०१८ मध्ये या प्रकरणी गुन्हा नोंदवला. पुण्यातील धोबीघाट, भैरोबा नाला येथून पोलिसांनी हबीबला अटक केली आणि त्यानंतर या प्रकरणात पाच बांगलादेशी नागरिकांना अटक करण्यात आली. या प्रकरणाचा तपास मे २०१८ मध्ये राष्ट्रीय तपास यंत्रणेकडे वर्ग झाला. तपासात अटक करण्यात आलेले बांगलादेशी नागरिक भारतात वैध कागदपत्राशिवाय राहत असल्याचे आढळून आले. आरोपींनी बनावट कागदपत्रांच्या आधारावर पॅन कार्ड, आधार ओळखपत्र, मतदार ओळखपत्र, शिधापत्रिका इत्यादी मिळवले होते आणि त्यांचा वापर भारतीय सिमकार्ड मिळविण्यासाठी, बँक खाती उघडण्यासाठी तसेच नोकरी मिळविण्यासाठी केल्याचा आरोप एनआयएने ठेवला होता. याशिवाय, सर्व आरोपी एबीटीच्या सदस्यांच्या संपर्कात असून त्यांना आश्रय आणि निधी दिल्याचे पुढील तपासात उघड झाल्याचेही एनआयएचा आरोप होता.

## SPORT

# Shubman Gill delivers huge update on his recovery ahead of 2nd Test vs Australia

**New Delhi -** Shubman Gill has delivered an update on his finger injury that forced him to miss the first Test between India and Australia in Perth. While Team India registered a stunning victory to start their tour of Australia on a winning note, the right-handed batsman had to see all the action from the sidelines.

He missed the Test after injuring his thumb while taking a catch during the intra-squad practice game at the WACA earlier this month.

According to reports, Shubman Gill suffered a hairline fracture and missed the first Test of the five-match series.

In his absence, Team India thrashed Australia by 295 runs to take the lead in the series. Batting first, India were bowled out for just 150 runs before bouncing back in style. Riding on captain Jasprit Bumrah's stunning 5-wicket haul, India bowled out Australia for only 104 runs.

In the second innings, Yashasvi Jaiswal and Virat Kohli





hit centuries to help India post 487/6 (declared). Chasing 533 runs, Australia could only manage 238 runs in their second innings.

While Shubman Gill missed the first Test, he is fully fit for the second Test. On Friday (November 29), the India star hit the nets and looked comfortable while batting. After the net session, he also gave an update on his injury.

The 25-year-old said that he felt much better than he had expected while batting in the nets. Gill also expressed his delight over his recovery.

"I was just trying to get a feel, to be honest, see how the injury is reacting, if there is any kind of jardness or any kind of soreness with me playing, but it actually went much better than I expected and Kamlesh bhai expected, and I'm very happy with that," said Shubman Gill in a video posted by BCCI.

Gill also made it clear that he was very disappointed over not being able to play in Perth. The youngster is yet to play at the iconic venue and could not hide his disappointment over missing out on the opportunity to play the first Test. At the same time, he also said that he eventually became happy after seeing the Indian team's thumping victory.

"Any ball, when it hits the bat, especially the middle of the bat, the feeling that you (0:06) get, that's the feeling that I play for. When I got to know about my injury for the first couple of days, I was quite low, a bit disappointed. Perth is the only venue where I haven't played when we came the last time," said Gill.

"I was looking forward to playing there and it's such an iconic venue. But the way we played that game, and by the end of it, I was very happy with the way that we played and we won the game," he added.

### Shardul Thakur registers joint-worst bowling figures in Syed Mushtaq Ali Trophy history



**New Delhi -** Discarded Indian all-rounder Shardul Thakur on Friday has the worst bowling figures in the history of Syed Mushtaq Ali Trophy.

Shardul Thakur conceded 69 for 1 in against Kerala, which is the joint expensive over. Shardul joins Ramesh Rahul of Arunachal Pradesh leaked 69 runs against Haryana, a couple of days ago. The previous record was held by Hyderabad's Pagadala Naidu (1/67) against Mumbai in 2010.

Shardul, who is making a comeback from the injury also remained unsold in the recently-concluded IPL mega auction. Shardul's performances have declined over the last three seasons. For Chennai Super Kings in the 2024 season in nine games, Shardul just picked up five wickets at an average of 61.80 from nine games.

# Team India coach tightlipped on Rohit Sharma's batting position in Adelaide Test

**New Delhi -** India will play Australia Prime Minister's XI in a two-day tour match at the Manuka Oval in Canberra starting on Saturday, with the aim of determining their batting lineup for the day-night Test in Adelaide the following week.

India have now played four day-night Test matches, and their solitary defeat was four years ago in Adelaide when they were bowled out for 36 before winning the Test series.

The think tank will have to change the batting order for the match starting on December 6 due to the arrival of Rohit Sharma, who missed the first Test because of the birth of his second child, and the anticipated return of a fit-again Shubman Gill.

The scheduled openers are Rohit and Yashasvi Jaiswal, but since the latter and KL Rahul played so well at the top in Perth, there is a case to be made for the Indian captain to go down the order.

Team India assistant coach Abhishek Nayar talked to reporters after a practice session in Canberra, but did not confirm



the batting spot for the Indian captain. On being asked about Rohit's batting spot and if anything has been decided by the Indian think tank, Nayar said, "Not yet. I think it is too early for us to think about that, we're just going to try and take this game and see how it goes and then maybe come up with plans once we reach Adelaide."

Gill took guard during Friday's first net practice, showing that his recuperation is going smoothly.

Talking about Gill's return, Nayar said, "His evaluation will be done by the physio. He looked quite comfortable while batting, at the moment he is batting indoors and a assessment whether he'll play tomorrow or not, will be done later."

Particularly during the twilight hour, the pink ball does far more than the red cherry. The bulk of Indian batters would prefer to feel the ball in the middle because it's not a top-tier game.

Talking about the pink ball, Nayar said, "The main thing is the adaptation of the colour and the extra lacquer on the pink ball, so we would like to get acclimatize with it in the next few days. The difference mainly is only about the mindset. We had practiced with the pink ball in Perth too."

When asked about the return of head coach Gautam Gambhir, currently in India for personal reasons, Nayar said, "Gauti bhai should be here soon.

# PV Sindhu survives scare, set to play quarterfinals along with three young Indian hopefuls for company

**New Delhi -** At the quarterfinals stage of the women's singles draw at the Syed Modi International, India will have a representative in each of the four matches. One, of course, is PV Sindhu, the stalwart of Indian badminton who has seen it all. But the encouraging sign is that among the other three one was born 2005 and two in 2007.

On Thursday, the three young Indians – Tasnim Mir and the pair of 17-year-olds in Unnati Hooda and Shriyanshi Valishetty – registered impressive second-round wins, each against higher-ranked players. Tasnim got the better of fifth seed Anupama Upadhyaya 21-15, 13-21, 21-7 in 53 minutes. Unnati overcame the heartbreak of losing two three-game battles against fourth seed Pornpicha Choeikeewong in the past, to prevail 21-18, 22-20 in a match that featured many grueling rallies.

The most impressive result for India was perhaps that of Shriyanshi who beat the second seed and in-form Malvika Bansod 21-12, 21-15 in just 34 minutes. In the form Malvika has been in recent weeks, a final against Sindhu was on the cards this week but Shriyanshi had other ideas.

Meanwhile, Sindhu survived a scare against another Indian in Ira Sharma 21-10, 12-21, 21-15 in 49 minutes and entered the last



eight of the Super 300 event in Lucknow. Ira isn't quite a young prodigy anymore, at 24 she is currently ranked 147th in the world. But she had world No.18 and the top seed for this event in serious strife. Having won the opening game at a canter, Sindhu fell to 1-11 in the second game before eventually losing it 12-21. In the third game too, the contest was neck-and-neck, with Sindhu trailing 14-15. But that is when Ira's game fell through while Sindhu dipped into her deep reserves of experience to win 7 straight points.

Sindhu, the only seeded player still standing, next faces Dai Wang, ranked 118th in the world. The 23-year-old Wang beat Devika Sihag 21-14, 21-15 and is one of the two Chinese shuttlers remaining in the draw, potentially preventing an all-Indian final.

Lucknow presents a golden chance for two star Indian shuttlers to close out a disappointing season with a title. Like Sindhu, Lakshya Sen is also the top seed in men's singles and Syed Modi is also their respective final event of 2024, having not qualified for the season finale. While Sindhu has been waiting since July 2022 for an individual title, Lakshya's wait has been ongoing since July 2023's triumph in Canada.

Lakshya, backing up his confidence-boosting win against Lee Zii Jia last week, has prevailed in straight games in both matches so far. In the second round, he won against Daniil Dubovenko of Israel 21-14, 21-13 in 35 minutes to set up an intriguing quarterfinal against Meiraba Luwang. Meiraba, who is regarded at the Prakash Padukone Badminton Academy as someone with the potential to be as good as Lakshya, pulled off an upset win 21-15, 21-13 against sixth seed Nhat Nguyen of Ireland.

While Lakshya and Meiraba feature in an all-Indian clash, Ayush Shetty, second seed Priyanshu Rajawat, and Rithvik Sanjeevi Satish Kumar will feature in the other quarterfinals. Third seed Kiran George, however, lost 21-19, 20-22, 11-21 against Shogo Ogawa of Japan.

In women's doubles, India's top two pairs and the top two seeds in this tournament, stayed on course to meet in the final as both Tanisha Crasto-Ashwini Ponnappa and Gayatri Gopichand-Treesa Jolly advanced. Tanisha will be in quarterfinal action in mixed doubles too, along with Dhruv Kapila. In men's doubles, Pruthvi Krishnamurthy Roy and Sai Pratheek, who were drawn to face SatChi before the top seeds withdrew, overcame a Chinese pair in Guo Ruo Han and Chen Xu Jun to reach the last eight along with two other Indian pairs.

# गोंदिया ते सडक अर्जुनी मार्गावर एसटी उलटली...

# बसमधून आठ मृतदेह बाहेर काढले...

● नागपूर, नितीन देवळेकर :

नागपूर जिल्ह्यात शालेय विद्यार्थ्यांच्या बसला अपघातात एका विद्यार्थ्याचा मृत्यू तर अनेक जण जखमी झाल्याची घटना नुकतीच घडली होती. ही घटना ताजी असतांनाच आता विदर्भातील गोंदिया ते सडक अर्जुनी मार्गावर डव्वा गावाजवळ एसटीची बस उलटली. त्यात वृत्त हाती येईपर्यंत आठ मृतदेह बाहेर काढण्यात आले होते. इतरही प्रवाश्यांना बाहेर काढण्याचे काम सुरू आहे. याबाबत आणखी जाणून घेऊ या.

सूत्रांच्या माहितीनुसार, गोंदिया- सडक अर्जुनी मार्गावर डव्वा गावाजवळच्या मुर्दाली जंगल परिसरातून एसटीची शिवशाही बस जात होती. बसची गती मर्यादेहून खूप जास्त होती. अचानक बसने पलटी घेतली. त्यानंतर बस बरेच फुट घासत गेली. या घटने बसमधील प्रवासी गंभीर जखमी झाले. ही माहिती कळताच परिसरातील गावातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत प्रवाश्यांना वाचवण्याचे काम हाती घेतले.

दरम्यान बसमध्ये अडकलेल्या प्रवाश्यांना काढण्यासाठी नागरिकांकडून बसमधील काचाही फोडण्यात आल्या. वृत्त हाती येईपर्यंत बसमधील सुमारे ८ मृतदेह बाहेर काढण्यात स्थानिकांना



यश मिळाले होते. पोलिसांनीही घटनेचे गांभिर्य बघत तेथे धाव घेत बंदोबस्त वाढवला. बसमधील प्रवाश्यांना बाहेर काढण्याचे काम युद्ध स्तरावर सुरू असून मृतांची संख्या वाढण्याची शक्यता आहे. अपघाताची माहिती कळताच एसटी महामंडळ, प्रादेशिक परिवहन विभागासह (आरटीओ) इतरही शासकीय यंत्रणेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. तर दुरीकडे अपघातग्रस्त बसमधील जखमींना प्रथम जवळच्या गोरेगाव व सडक अर्जुनीतील ग्रामीण रुग्णालयात व तेथून काही गंभीर रुग्णांना इतरत्र तातडीने हलवण्यात आल्याचीही माहिती उपस्थितांनी दिली.

### एसटीच्या प्रवासावर गंभीर प्रश्नचिन्ह

■ सर्वात सुरक्षीत सार्वजनिक प्रवासी वाहतुकीचे साधन म्हणून एसटीच्या प्रवासी वाहतुकीकडे बघितले जाते. परंतु या अपघातामुळे एसटी महामंडळाच्या सुरक्षीततेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. दरम्यान एसटी महामंडळ सध्या आर्थिक कोंडीत आहे. त्यातच महामंडळातील कर्मचाऱ्यांकडून बऱ्याचदा आंदोलनही केले जाते. आंदोलनादरम्यान कामगार संगटनांकडून बऱ्याचदा एसटी बसेसच्या देखभाल- दुरूस्तीच्या कामासह महामंडळात नवीन बसेस येण्याचे प्रमाण कमी असल्याने भंगार बसेसचे प्रमाण जास्त असल्याचाही आरोप होतो. त्यामुळे महामंडळात जुन्या व कालबाह्य बसेसमुळे अपघात वाढत आहे काय? हा प्रश्न उपस्थित झाला आहे. या विषयावर एसटी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी भ्रमनध्वनीवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी अधिकारी अपघात झालेल्या घटनास्थळी निघाले अशून लवकरच पोहचणार असल्याचे सांगितले. त्यानंतरच वास्तविक स्थळी सांगणे शक्य असल्याचे त्यांचे म्हणने होते.

## रेल्वेत नोकरीच्या आमिषाने दहा लाखांची फसवणूक

● पुणे, अभिजीत येरल्लू :




रेल्वेत नोकरीच्या आमिषाने दहा लाख रुपयांची फसवणूक करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला. याप्रकरणी बंडगार्डन पोलिसांनी एकाविरुद्ध गुन्हा दाखल केला.

राजेश दिनकर राजगुरु (वय ५०, रा. हरीविश्व अपार्टमेंट, पाथर्डी शिवार, नाशिक) असे गुन्हा दाखल केलेल्याचे नाव आहे. याबाबत एकाने बंडगार्डन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार चिंचवड परिसरात राहायला आहेत. त्यांची आरोपी राजगुरु याच्याशी २०२१ मध्ये ओळख झाली होती. तक्रारदाराच्या परिचितांना त्याने रेल्वेत नोकरी लावण्याचे आमिष दाखविले होते. रेल्वेतील अधिकाऱ्यांशी ओळख असल्याची बतावणी त्याने तक्रारदाराकडे केली होती. त्यानंतर तक्रारदाराने राजगुरुला वेळोवेळी रोख आणि ऑनलाइन स्वरुपात दहा लाख रुपये दिले. दहा लाख रुपये दिल्यानंतर राजगुरुने नोकरी लावली नाही. त्यानंतर राजगुरुने त्यांना जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात भेटायला बोलावले. तक्रारदाराच्या ईमेलवर त्याने रेल्वेत आरोग्य निरीक्षकपदावर नोकरी मिळाल्याबाबतचे बनावट नियुक्तीपत्र पाठविले. चौकशीत नियुक्तीपत्र बनावट असल्याचे उघडकीस आले. तक्रारदाराने नुकतीच पोलिसांकडे तक्रार दिली.

## नव्या राज्य शासनाकडून लोकल प्रवाशांना अपेक्षा वाढल्या - उपनगरीय रेल्वे प्रवासी महासंघ

● मुंबई, विशाल पाटील :

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीत महायुतीला दिलेल्या प्रचंड बहुमतामुळे उपनगरीय रेल्वे प्रवाशांच्या या सरकारकडून अपेक्षा वाढल्याचे दिसून येत आहे. मुख्यतः मुंबई महानगर प्रदेशातील दीर्घकाळ रखडलेले रेल्वे प्रकल्प वेगाने पूर्ण होतील अशी रास्त अपेक्षा लोकल प्रवासी व्यक्त करीत आहेत. यामधे ठाणे स्थानकावरील प्रवाशांना दिलासा देणारा कळवा ऐरोली एलिव्हेटेड रेल्वे प्रकल्प युद्धपातळीवर पूर्ण करावा अशी जोरदार मागणी आहे. या प्रकल्पामुळे डोंबिवली ते कर्जत कसारा मार्गावरील लाखो लोकल प्रवासी थेट नवी मुंबईत जाणार आहेत. मुंबई नागरि परिवहन प्रकल्पातील हा महत्वाकांक्षी व सर्वाधिक उपयुक्त प्रकल्प आहे. भूसंपादन व पुनर्वसनाच्या सर्व अडचणी सोडवून हा प्रकल्प प्राधान्याने पूर्ण करावा अशी अपेक्षा रेल्वे प्रवासी महासंघाने व्यक्त केली आहे. Mutp चे सर्व प्रकल्प केंद्र आणि महाराष्ट्र सरकारच्या संयुक्त आर्थिक सहभागाने होत असताना प्रवाशांची ही मागणी असून राज्य शासनाने या प्रकल्पाला प्राधान्य दिलेच पाहिजे अशी सार्वत्रिक भावना व्यक्त होत आहे.

त्याशिवाय कल्याण यार्ड रि मॉडेलिंग प्रकल्प,२०१९ ला पंतप्रधान मोदींच्या हस्ते भूमिपूजन



झालेला मुरबाड रेल्वे प्रकल्प,आसनगाव व बदलापुर तिसरी चौथी मार्गिका आणि बदलापुर व टिटवाळा सर्व लोकल १५ डबा चालविण्याचा प्रकल्प या कामांकडे महाराष्ट्र शासनाने लक्ष केंद्रित करावे अशी अपेक्षा मध्य रेल्वेच्या मुख्य मार्गावरील लाखो प्रवासी व्यक्त करीत आहेत. त्यातही वातानुकूलित लोकल टप्प्याटप्प्याने वाढवा पण कल्याण ते ठाणे पट्ट्यातील गर्दीचे बळी थांबविण्यासाठी टिट वाळा व बदलापुर या सर्व लोकल १५ डब्यांच्या तात्काळ चाल विण्यासाठी लोकल प्रवासी अत्यंत आग्रही असल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे. मुंबई महानगर प्रदेशातील लोकल प्रवासी व वाहनांची संख्या वाढली असून Mmr मधील सर्व रेल्वे फाटके बंद करून प्रत्येक रेल्वे स्थानका जवळ उड्डाणपूल ROB उभारण्याची मागणी उपनगरीय रेल्वे क्षेत्रातील जनता करीत असून या महत्वाच्या मागणीकडे राज्य शासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज व्यक्त होत आहे.

## टोमॅटोच्या शेतात गांजाची शेती, १३ लाख रुपयांची झाडे जप्त

● नाशिक, सचिन कदम :



जिल्ह्यातील वडनेर भैरव हद्दीत टोमॅटोच्या शेतात गांजा लागवड करण्यात आल्याने पोलिसांनी छापा टाकून १३ लाख रुपयांची २१५ किलो गांजाची झाडे जप्त केली. जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील अवैध व्यवसायाचे समूळ उच्चाटन करण्यासाठी पोलीस अधीक्षक विक्रम देशमाने यांनी ठाणेनिहाय कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखा आणि वडनेर भैरव पोलिसांनी गांजाची लागवड करणाऱ्या एका शेतकऱ्याविरुध्द कारवाई केली. वडनेर भैरव हद्दीत दुधखेड शिवारातील तपनपाडा येथे काही जणांनी गांजाची शेती केल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक राजु सुर्वे यांना मिळाली. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखा आणि वडनेर भैरव पोलिसांनी तपनपाडा परिसरात रवींद्र गांगुर्डे (४०, रा. तपनपाडा) यांच्या मालकीच्या शेतात छापा टाकला. छाप्यात २१५ किलो वजनाची गांजाची ६५ झाडे सापडली. यांची किंमत १२ लाख ९३ हजार ६० रुपये असल्याचे सांगितले जाते. गांगुर्डे याने स्वतःच्या टोमॅटोच्या शेतात गांजाच्या झाडांची बेकायदेशीररित्या लागवड केली होती. त्याच्याविरूध्द वडनेर भैरव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याला अटक करण्यात आली आहे. दरम्यान रविंद्र याच्यावर वडनेर भैरव पोलीस ठाण्यात आधीही जबरी चोरीचा गुन्हा दाखल आहे. हा गांडा लागवड करत कुठे व कोणास विक्री करणार होता, याबाबत सखोल तपास तपासी पथक करत आहे.

## अल्प भूधारक शेतकऱ्याचा मूलगा झाला 'क्लास वन'

● किनवट , सुचिता देशमुख :

पाणी टंचाईग्रस्त पाचोंदा गावातील अल्प भूधारक शेतकऱ्याचा मुलगा राहुल शंकरराव महामुने यांनी मोठ्या परिश्रम व जिद्दीने अभ्यास करून एमपीएससी परिक्षेत उज्ज्वल यश मिळवून " 'क्लास वन' अधिकारी 'अ' पदाला गवसनी घातल्याबद्दल सर्वत्र त्यांचे कौतुक होत आहे.

अतिदूर्गम पाचोंदा येथील अल्पभूधारक शेतकरी दाम्पत्य रमाबाई व शंकरराव महामुने यांनी आपल्या मुलांना शिक्षणाचं बाळकडू पाजलं. शिक्षणावर भर देवून त्यांनी तिन्ही मुलं शिक्षक केली. त्यांचा मोठा मूलगा अनिल महामुने हे शिक्षक ते शिक्षण विस्तार अधिकारी असा प्रवास करत, माजी गट शिक्षणाधिकारी व पीएम पोषण आहार शक्ती निर्माण योजना अधिक्षक या पदावर कार्यरत आहेत. त्यांचा दुसरा मुलगाही शिक्षक आहे. राहूल महामुने हा त्यांचा धाकटा मुलगा.

राहूलचे प्राथमिक शिक्षण पाचोंदा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत झाले. त्यानंतर गोकुंदा येथील महात्मा ज्योतिबा फुले विद्यालयात माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण झाले. पनवेल येथून डी.एड् उत्तीर्ण झाल्यानंतर शासकिय



आश्रम शाळा झराळा येथे सह शिक्षक म्हणून रूजू झाले. बदलीनंतर शासकीय आश्रम शाळा सारखणीत आले येथे ते विद्यार्थी प्रिय गुरुजी ठरले. याच परिक्षेत्राचे शिक्षण विस्तार अधिकारी असलेले मोठेबंधू अनिलकुमार महामुने यांनी सदैव त्यांना प्रेरणा दिली. अन् त्यांच्यामुळेच राहूल स्पर्धा परिक्षेच्या तयारीला लागले.

पहिल्याच परिक्षेत उत्तीर्ण होऊन ते गृहपालपदी नंदूरबार येथे रुजू झाले. तेवढ्यावरच समाधान न मानता महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी ) परीक्षा देण्याची जिद्द उराशी त्यांनी बाळगली. त्यातच सन २०२० मध्ये एमपीएससीची वरिष्ठ संशोधन अधिकारी/ सहायक आयुक्त/ प्रकल्प अधिकारी गट 'अ' या आदिवासी विकास विभागातील सरळसेवा पदभरतीसाठी जाहिरात आली. फार्म भरून कठोर परिश्रम व अभ्यासात सातत्य ठेवून परीक्षा दिली. परीक्षा तेव्हाच झाली ; परंतु २८ नोव्हेंबर २०२४ रोजी आलेल्या निकालात राहूल महामुने हे महाराष्ट्रातून प्रथम आले.

## भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे प्लॅस्टिक निर्मूलन पथकाची धडक कारवाई

● ठाणे, सम्यक कासारे :

महाराष्ट्र शासन यांचे मार्फत आगामी काळात सर्व सण व उत्सव पर्यावरणपुरकक साजरे करणेबाबत मार्गदर्शक सुचना प्राप्त झाले असुन त्याअनुषंगाने भिवंडी शहरातील एकल वापर प्लॅस्टिक बंदी मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी करीता प्लॅस्टिक निर्मुलन पथक तयार करणेत आलेला आहे.

मा. प्रशासक तथा आयुक्त सो. आणि मा. उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, कल्याण यांचे निर्देशानुसार महानगरपालिकेचे प्लॅस्टिक निर्मुलन पथक, आणि प्लॅस्टिक निर्मुलन पथक कर्मचारी यांनी संयुक्तपणे दिनांक २७/११/२०२४ रोजी मे. टिप टॉप स्विट अँड फरसाण मार्ट, कल्याणनाका, भिवंडी आणि मे. रिषभ पोलिस्टर एल.एल.पी. भिवंडी टॉकीज, भाजी मार्केट, भिवंडी या ठिकाणी धाड टाकली असता जनरल आयटम्स्, प्लास्टिक पिशवी (अविघटनशील एकल वापर प्लॅस्टिक) साठा अंदाजे १००० किलो माल जप्त करण्यात आलेला आहे. जप्त केलेला माल मनपाच्या आरोग्य भांडारगृहात जमा करण्यात आलेला आहे. संबंधित दुकानदार यांना अविघटनशील प्लॅस्टिक साठवणुक करीता रक्कम रु. १०,०००/- दंड आकारण्यात आला आहे.

## वणव्यांमुळे जैवविविधता धोक्यात



● पाली, धनश्री सट्टा :

पश्चिम घाटाचा विस्तिर्ण पट्टा, विपुल जैवविविधता व डोंगरदऱ्यांनी वेढलेला आणि ऐतिहासिक वारशांचा ठेवा म्हणून रायगड जिल्हा ओळखला जातो. मात्र येथे वारंवार लागणाऱ्या मानवनिर्मित व काही प्रमाणात नैसर्गिक वणव्यामुळे जैवविविधता, वनसंपदा व पशू-पक्षांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. शिवाय मालमत्ता देखील नष्ट होते.

सध्या ठीक ठिकाणी वणवे लागण्यास सुरुवात झालेली आहे. पावसाळ्यात जिल्ह्यातील डोंगर, माळरान, किल्ले, गड, जंगल या सर्व ठिकाणी पावसाळ्यात मोठया प्रमाणात छोटी झुडपे व गवत उगवते. पावसाळ्यानंतर ही झुडप व गवत सुकते आणि अशा माळरान, डोंगर व शेतात सुकेल्या झुडप व गवताला नैसर्गिकरीत्या वणवा लागतो, तर काही लोक कळत-नकळत आग लावतात. या आगीचे रुपांतर प्रचंड नैसर्गिक व कृत्रिम वणव्यात होते. दरवर्षी जिल्ह्यात हजारो हेक्टर क्षेत्रावर असे वणवे लागतात. परिणामी या आगीत झाडे-झुडपे, पशू-पक्षी, सूक्ष्मजीव तसेच सरपटणारे प्राणी यांचा जळून मृत्यु होवुन सजीवसृष्टीवर त्याचा विपरीत परिणाम होत आहे. जिल्ह्यातील विविध ऐतिहासिक वास्तू आणि किल्ल्यांवरील हे वणवे या ऐतिहासिक वस्तूंना देखील नुकसान पोहचवत आहेत. सध्या अशा वनव्यांना मोठ्या प्रमाणात सुरुवात झाली आहे. गवत जळल्याने गवतावर अवलंबुन असणाऱ्या गुरे-ढोरांवर उपासमारीची वेळ येते. मोठ्या प्रमाणात सजीव सृष्टीचे नुकसान होते. या वणव्यांवर नियंत्रण आणणे अत्यंत गरजेचे आहे.

■ बहुतांश वणवे हे मानवनिर्मित असतात. नोव्हेंबर अखेरपासून व मार्च नंतर पानगळ सुरू झाल्यावर या दोन वेळा जिल्ह्यात वणवे लागतात. यावेळी पक्षांचा विणीचा हंगाम असतो. त्यामुळे पक्षी, त्यांचा अधिवास, त्यांची पिल्ले आणि अंडी नष्ट होतात. तसेच वणव्यामुळे महत्वाची जैवविविधता धोक्यात येते. मधमाशी तसेच इतर कीटक, रानफुले, मृदा आदींना देखील प्रत्यक्ष अप्रत्यक्षरीत्या वणव्याची झळ बसते. वणव्यांमुळे जमिनीवरील गवत, झुडुपे जळून जातात. जूनमध्ये पडणाऱ्या पहिल्या पावसात सह्याद्रीच्या तीव्र उतारावरून जमिनीची मोठ्या प्रमाणात धुप होते. परिणामी नद्यांचे व खड्यांचे पात्र उथळ होऊन पुराची परिस्थिती होते. वणवे रोखण्यासाठी वन विभागाकडून जनजागृती व प्रबोधन केले जाते. अत्याधुनिक फायर ब्लोअर द्वारे वणवे विझविले जातात. जाळरेषा काढली जाते.

- समीर शिंदे, वनक्षेत्रपाल, कांदळवन, अलिबाग

## बेपत्ता मुले-महिलांच्या शोधासाठी राज्यात ऑपरेशन 'मुस्कान मोहीम'

● पुणे, शकील शेख :



राज्याच्या वेगवेगळ्या शहरातून बेपत्ता झालेली मुले, तसेच महिलांच्या शोधासाठी पोलिसांकडून 'ऑपरेशम मुस्कान – १३' ही विशेष मोहीम १ ते ३० डिसेंबर या कालावधीत राबविली जाणआर आहे.या मोहिमेच्या अनुषंगाने पुणे पोलिसांच्याअनैतिक मानवी वाहतुक व्यापार प्रतिबंध कक्ष, गुन्हे शाखा, तसेच सर्व पोलीस ठाण्यांमध्ये विशेष पथकाची स्थापना करण्यात येणार आहे. या पथकाच्या माध्यमातून शहरातील सर्व पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकाऱ्यांशी समन्वय साधण्यात येणार आहे. पोलीस ठाण्यातील वरिष्ठ पोलीस निरीक्षक, एक सहायक निरीक्षक, तीन पोलीस कर्मचाऱ्यांचा या पथकात समावेश राहणार आहे. या मोहिमेतंर्गत पुणे शहर, तसेच परिसरातून बेपत्ताा झालेली मुले, तसेच तरुणींचा शोध घेण्यात येणार आहे.

'ऑपरेशन मुस्कान – १३ ' ही राज्यभरातील अल्पवयीन मुले आणि १८ वर्षावरील महिलांचा शोध घेण्यासाठी हाबविण्यात आलेला एक प्रभावी उपक्रम आहे. पुणे शहरातील सर्व पोलीस अधिकाऱ्यांना याबाबतचे आदेश देण्यात आले आहेत.


## ठाण्यातील पदपथ फेरीवाल्यांना आंदण, सायंकाळच्या वेळी पदपथावरून चालणे अवघड

● ठाणे, रोहित जैसवार :

शहर पुन्हा फेरीवाल्यांच्या विळख्यात अडकल्याचे दिसत आहे. रेल्वेस्थानका बाहेरील परिसरात सायंकाळच्यावेळी पदपथांवर फेरीवाल्यांचा बाजार भरत आहे. पदपथावर विक्री साहित्यासह ठाण मांडून बसलेले फेरीवाले आणि त्यांच्याकडे खरेदीसाठी आलेल्या ग्राहकांमुळे पदपथ अडविला जात आहे. हे फेरीवाले रात्री उशिरापर्यंत या ठिकाणी विक्री करतात. या फेरीवाल्यांमुळे नागरिकांना पदपथावरून चालणे शक्य होत नसून नागरिक प्रचंड हैराण झाले आहेत. तर, फेरीवाल्यांवर वारंवार कारवाई करण्यात येत असल्याचा दावा महापालिकेकडून केला जात आहे.

ठाणे पश्चिम रेल्वे स्थानक परिसरातून दररोज लाखोच्या संख्येने नागरिक प्रवास करतात. या स्थानकाबाहेरील सॅटीस पुलाखाली सकाळच्या वेळेत फेरीवाले फारसे दिसून येत नाहीत. परंतू, सायंकाळ होताच या ठिकाणी फेरीवाले येण्यास सुरुवात होते. सायंकाळी घरी परतणारे अनेक नागरिक निवांत असतात, त्यामुळे ते काही तरी खरेदी करतील या उद्देशाने फेरीवाले वेगवेगळे साहित्य विक्रीसाठी घेऊन याठिकाणी बसलेले पाहायला मिळतात. खरंतर हा बाजार सायंकाळच्या वेळी कामावरुन घरी परतणाऱ्या प्रवाशांसाठी त्रासदायक ठरु लागला आहे.

स्थानकाबाहेरील सॅटीस पुलाखाली, गावदेवी परिसर, नौपाडा, नितीन कंपनी तसेच स्थानक परिसरातील आंबेडकर पुतळा परिसरातही फेरीवाले पदपथ



आणि रस्ते अडवीत असल्याचे दिसत आहे. या मार्गावरुन येणाऱ्या – जाणाऱ्या नागरिकांना या फेरीवाल्यांचा प्रचंड त्रास होत आहे. महापालिका प्रशासनाचे या फेरीवाल्यांकडे दुर्लक्ष होत असल्यामुळे शहरातील रस्ते आणि पदपथ फेरीवाल्यांना आंदण दिले आहेत का असा सवाल काही नागरिकांकडून विचारला जात आहे. तर, फेरीवाल्यांवर वारंवार कारवाई केली जात असून स्थानक परिसर फेरीवाला मुक्त करण्यात आला असल्याचा दावा महापालिका प्रशासनाकडून करण्यात आला आहे.

मी दररोज गावदेवी परिसरातून लोकमान्य नगरला जाण्यासाठी रिक्षा पकडतो. अनेकदा सायंकाळच्यावेळी याठिकाणी जाण्यासाठी रिक्षा उपलब्ध नसतात. त्यामुळे रिक्षा येईपर्यंत थांबावे लागते. या रिक्षा थांब्याला लागूनच पदपथ असूनही फेरीवाल्यांमुळे रस्तावरच उभे राहावे लागत आहे अशी प्रतिक्रिया राज चव्हाण यांनी दिली. स्थानक परिसर ते गावदेवी मंदिरापर्यंतचा सर्व परिसर फेरीवाला मुक्त केला आहे. फेरीवाल्यांसदर्भात नुकतीच आमची बैठक झाली. स्थानक परिसर फेरीवाला मुक्त करण्यासाठी आम्ही पूर्णपणे बंदोबस्त ठेवला आहे. यासाठी पथक नेमण्यात आले असून हे पथक दोन सत्रात काम करणार आहे. त्यामुळे सॅटीस पुलाखाली, पादचारी पुल, स्थानक परिसर, गावदेवी परिसर या ठिकाणी येत्या दिवसात एकही फेरीवाला दिसणार नाही. स्थानक परिसर ते गावदेवी मंदिर या १५० मीटर च्या क्षेत्रात फेरीवाल्यांना बसण्यास मनाई आहे. तरी, या क्षेत्रात फेरीवाले दिसले तर, ताटकळ त्यांच्यावर कारवाई केली जाते. १५० मीटरच्या पुढील जे क्षेत्र आहे तसेच इतर परिसरातही अतिक्रमण विभागाची कर्मचारी नेमण्यात आली आहेत. त्यामुळे फेरीवाल्यांवर कारवाई नियमित सुरु आहे, अशी प्रतिक्रिया ठाणे महापालिका अतिक्रमण नियंत्रण विभागाचे उप आयुक्त शंकर पाटोळे यांनी लोकसत्ताशी बोलताना दिली.